रायगड, नवी मुंबई


# राम प्रहर

वर्ष १८ • अंक ३५९

www.ramprahar.com

शुक्रवार, १७ जुलै २०२६ • पाने ८ • किंमत ₹२


## महाराष्ट्र विधिमंडळात 'नेवा' कार्यप्रणालीचा स्वीकार



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'एक राष्ट्र, एक उपयोजन' (वन नेशन, वन ॲप्लिकेशन) या दूरदर्शी संकल्पनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधिमंडळाचे कामकाज संपूर्णपणे संगणकीय आणि कागदविरहित करण्यासाठी गुरुवारी (दि. १६) महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. मुंबईतील विधान भवन येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत महाराष्ट्र विधिमंडळात 'नॅशनल ई-विधान ॲप्लिकेशन' (नेवा) ही एकात्मिक संगणकीय कार्यप्रणाली स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत प्रणालीची उद्दिष्टे, तांत्रिक बाबी, अंमलबजावणीची प्रक्रिया आणि सामंजस्य करारातील तरतुदींचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या अंतिम मान्यतेनंतर यासंदर्भातील सामंजस्य करारावर लवकरच स्वाक्षरी केली जाणार असून पुढील तीन महिन्यांत महाराष्ट्रात ही प्रणाली पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.

अंतरंग


कर्जत-लोणावळा रेल्वेमार्ग पूर्ववत; दरड हटवली/३

पेण तालुक्यातील प्रमुख पर्यटनस्थळांवर बंदी!/५

थरारक विजयासह अर्जेंटिना फायनलमध्ये/८








# ओला, उबरसह सर्व कंपन्यांना आता राज्य सरकारचा परवाना बंधनकारक!



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ॲप-आधारित प्रवासी वाहतूक सेवा अधिक सुरक्षित आणि नियमबद्ध करण्यासाठी राज्य शासनाने नवीन ॲग्रीगेटर धोरण लागू केले आहे. या धोरणानुसार आता ओला, उबर, रॅपिडो यांसारख्या सर्वच ॲग्रीगेटर कंपन्यांना शासनाने निर्धारित केलेल्या कठोर नियम व अटींचे पालन करून परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

"या नव्या धोरणामुळे शासनाला कायदेशीर महसूल मिळणार असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य लाभेल. त्याचसोबत, चालकांचे आर्थिक हित जपले जाऊन स्थानिक युवक-युवतींसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील," अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी दिली. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि वाहनांवर रिअल-टाईम देखरेख ठेवण्यासाठी शासन एक विशेष ऑनलाइन पोर्टल विकसित करणार आहे.

परिवहनमंत्री सरनाईक म्हणाले की, राज्यातील लाखो प्रवासी दररोज ॲप-आधारित वाहतूक सेवांचा वापर करतात. मात्र, या क्षेत्रात एकसमान नियमावली नसल्यामुळे प्रवासी सुरक्षा, चालकांचे उत्पन्न, भाडे आकारणीतील मनमानी, तक्रार निवारणातील विलंब आणि शासनाच्या महसुलाबाबत अनेक प्रश्न निर्माण होत होते. नव्या धोरणामुळे या सर्व बाबींना कायदेशीर आणि पारदर्शक चौकट प्राप्त झाली आहे. या धोरणानुसार राज्यात कार्यरत असलेल्या प्रत्येक ॲग्रीगेटर कंपनीला राज्य परिवहन प्राधिकरणाकडून परवाना घेणे बंधनकारक राहील आणि प्रत्येक कंपनीला स्वतंत्र परवाना ओळख क्रमांक प्रदान करण्यात येईल. शासनामार्फत विकसित केल्या जाणाऱ्या विशेष ऑनलाइन पोर्टलद्वारे वाहनांचे जीपीएस ट्रॅकिंग, चालकांची पडताळणी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करणे सुलभ होणार आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक ॲग्रीगेटरला २४ तास कार्यरत कॉल सेंटर, तक्रार निवारण अधिकारी नेमणे बंधनकारक राहील. चालकांकडे वैध वाहन परवाना आणि बॅज असणे आवश्यक असून, त्यांना सलग १२ तासांपेक्षा अधिक वाहन चालविण्यास मनाई करण्यात आली आहे. चालक आणि सहप्रवाशांसाठी विमा संरक्षणाची तरतूदही यात आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी राईड पूलिंग सेवेमध्ये महिला प्रवाशांना केवळ महिला चालक अथवा महिला सहप्रवाशांसोबत प्रवास करण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच, ॲप आणि संकेतस्थळ मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये असणे बंधनकारक आहे. चालकांच्या आर्थिक हिताचे संरक्षण करण्यासाठी एकूण भाड्याच्या किमान ८० टक्के रक्कम चालकांना मिळण्याची शाश्वती घेण्यात आली आहे. सर्ज प्रायसिंगला मर्यादा घालत प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामार्फत मूलभूत भाडे निश्चित केले जाणार असल्याने प्रवाशांची भाडे आकारणीतील मनमानीतून सुटका होणार आहे

चालकांना बॅच बंधनकारक

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, एका ॲप प्लॅटफॉर्मवर नोंदणीकृत वाहनांची संख्या मुंबई, पुणे, नाशिक आणि नागपूर या शहरांमध्ये ५० पेक्षा अधिक असू शकणार नाही, तर राज्यातील इतर भागांमध्ये ही मर्यादा २५ वाहनांची असेल. व्यावसायिक प्रवासी वाहतूक करणाऱ्या चालकांसाठी बॅच अनिवार्य करण्यात आला असून त्यासाठी महाराष्ट्रातील रहिवासी असल्याचा पुरावा आणि व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील. महाराष्ट्रातील रोजगाराच्या संधींवर सर्वप्रथम येथील युवक-युवतींचा हक्क आहे, असे सांगत स्थानिक युवकांना सन्मानजनक रोजगार मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला ही प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

## मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरांना रायगडात उत्स्फूर्त प्रतिसाद



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरे अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या "प्रोजेक्ट आशादीप" अभियानाला जिल्ह्यात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत १३ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांमधून ८६७ लाभार्थ्यांनी विविध आरोग्य सेवांचा लाभ घेतला.

मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र, पोयनाड येथे विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिला व बालकल्याण सभापती रसिका केणी, पंचायत समिती अलिबागच्या सभापती भाग्यता पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ.पद्मश्री आंधळकर यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधिकारी-कर्मचारी, आशा सेविका व ग्रामस्थ उपस्थित होते.

शिबिरात लाभार्थ्यांची रक्तदाब, रक्त तपासणी, रक्तातील साखर, ईसीजी, नेत्र तपासणी, आयुष्मान कार्ड व आभा कार्ड नोंदणी करण्यात आली. तसेच आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी एएनसी क्लिनिकचे आयोजन करण्यात आले असून एका लाभार्थ्यास एचपीव्ही लसीकरण करण्यात आले. या शिबिरात ८७ ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, रेवदंडा येथेही "प्रोजेक्ट आशादीप" अंतर्गत आयोजित आरोग्य शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या शिबिरामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणीसह विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. या शिबिरात २३४ नागरिकांनी सहभाग नोंदवून आरोग्य सुविधांचा लाभ घेतला.

जिल्हाभरात सुरू असलेल्या या अभियानातून ज्येष्ठ नागरिकांची सर्वंकष आरोग्य तपासणी, आयुष्मान भारत व आभा कार्ड नोंदणी, विविध तपासण्या, आरोग्य मार्गदर्शन तसेच प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे.

## इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनचा पदग्रहण सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनचा पदग्रहण सोहळा बुधवारी (दि. १५) उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून वसुधा सहस्रबुद्धे उपस्थित होत्या. वनवासी कल्याण आश्रम, रसायनी शाखेच्या अध्यक्षा आहेत.

इनरव्हील क्लबच्या फास्ट डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ. शोभना पालेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन यावेळी मिळाले. या सोहळ्याला क्लबच्या सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. नवनिर्वाचित अध्यक्षा ॲड. शुभांगी बहिरा यांची ओळख पास्ट प्रेसिडेंट मेघना चांदोरकर यांनी करून दिली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. प्रीती गुरमे यांच्या सुरेल गणेश वंदनेने आणि दीपप्रज्वलनाने झाली.

जुलै महिन्यातील बुलेटिनचे प्रकाशन डॉ. राजश्री बागडे यांनी मान्यवरांच्या हस्ते केले. या सोहळ्यासाठी हेमंत बहिरा, चारुदत्त भगत, किशोर बागडे, इन शेप जिमच्या ओनर सई पालवणकर तसेच नगरसेविका दर्शना भोईर यांनी पुष्पगुच्छ देऊन नवीन टीमचे अभिनंदन केले.

## रेवदंडा येथे महाराष्ट्रभूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी स्वागत कमानीचे भूमिपूजन



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथे महाराष्ट्र भुषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी स्वागत कमानीचे भुमिपुजन कार्यक्रम मोठया उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेशाने रेवदंडा येथे महाराष्ट्र भुषण डॉॅ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या स्वागत कमानी उभारण्यात येत आहे. या स्वागत कमानी उभारण्यासाठी अलिबाग-मुरूडचे शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांनी पाठपुरावा केला होता.

थेरोंडा पानसेवाडी, रेवदंडा मोठे बंदर व रेवदंडा बायपास येथील मुख्यः रस्त्यावरमहाराष्ट्र भुषण डॉॅ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी स्वागत कमानी नव्याने उभारण्यात येत आहे. या नव्याने उभारण्यात येत असलेल्या स्वागत कमानीचे भुमिपुजन कार्यक्रम गुरूवार दि. १६ जुलै रोजी आयोजीत केला होता. यावेळी कामगार नेते दिपक रानवडे, जि.प.सदस्य अनंत गोंधळी, जि.प.सदस्य डॉॅ सचिन राऊळ, मुरूड पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ अलिबाग पंचायत समिती सभापती भाग्यता पाटील, अलिबाग पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी, उपजिल्हा प्रमुख शैलेश चव्हाण, रेवदंडा ग्रा.प.सरपंच प्रफुल्ल मोरे, मांडळा ग्रा.प.सरपंच ऋतिक नागोठकर,सि.एम.ठाकूर, सुरेश म्हात्रे, मुरूड तालुका युवासेना प्रमुख अमोल लाड,रोहा शिवसेना उपतालुका प्रमुख उद्धेश वाडकर, ॲड मनमीत पाटील, मोहन ठाकूर, हर्षल घरत, रणजीत धरणकर, प्रशांत शेणवईकर, योगेश पिटनाईक, केदार खोत, समिर आठवले, रेवदंडा ग्रा.प.सदस्या लिना मानकर, नारायण मुंबईकर, चद्रकांत दांडेकर, सुदेश राऊळ,सुरेश घरत-कोटकर,प्रविण घरत, जयवंत नागवेकर यांची उपस्थिती होती.

अलिबाग पंचायत समिती सभापती भाग्यता पाटील यांचे हस्ते पुजाविधी करण्यात आला. त्यानंतर डॉॅ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठाणचे वतीने श्रीफळ वाढविण्यात आला, आमदार महेंद्र दळवी यांचे हस्ते कुदळ मारून स्वागत कमानीचे नुतन बांधकामास प्रारंभ करण्यात आला.

निरूपणकार महाराष्ट्र भुषण डॉॅ. नानासाहेब धर्माधिकारी यांचे स्वागत कमानी उभारण्याचे अनेक वर्षाची स्वप्नपुर्तीची पुर्तता आज भुमिपुजन कार्यक्रमाने होत आहे. निरूपणकार महाराष्ट्र भुषण डॉॅ. नानासाहेब धर्माधिकारी यांचे सर्वसामान्यासाठी घेतलेला वसा, व कार्य यांची स्वागत कमानीचे उभारणीतून नित्याने आठवण देणारी ठरेल, येत्या तिन महिन्यात या स्वागत कमानीच्या कामाची पुर्तता होईल, शासनाचे वतीने करण्यात येत असलेल्या स्वागत कमानीच्या शुभारंभ प्रसंगी सर्व पक्षीय मंडळी उपस्थित राहतील असे आमदार दळवी यांनी म्हटले.

## पनवेलच्या पाले बुद्रुकमध्ये धर्माधिकारी प्रतिष्ठानचा वृक्षसंवर्धन उपक्रम



**खारघर : प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनासाठी डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने पनवेल तालुक्यातील पाले बुद्रुक फणसवाडी गावाजवळ वृक्ष लागवड व संवर्धन मोहीम राबविण्यात आली. १२ जुलै रोजी पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सचिनदादा धर्माधिकारी आणि स्वरूपा सचिनदादा धर्माधिकारी यांच्या हस्ते या मोहिमेचा शुभारंभ झाला.

यावेळी पाले बुद्रुक वनक्षेत्र परिसरात सुमारे ४१४ वृक्षांची लागवड करण्यात आली. पनवेल तालुक्यात अनेक ठिकाणी धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने विविध लोकोपयोगी व समाजसेवी उपक्रम राबविले जातात. त्यापैकीच हा एक उपक्रम आहे. डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमांपैकी वृक्ष लागवड व संवर्धन हा महत्त्वाचा उपक्रम आहे. याअंतर्गत जुलै २०१३पासून पाले बुद्रुक येथील सुमारे २३२ एकर सरकारी जागेत ९२ हजार वृक्षांची लागवड करून त्यांचे संवर्धन केले.

## पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यास प्रतिसाद

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड अलिबाग आणि डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. १५) जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला सचिन जाधव, उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय, मुंबई विभाग, श्रीकांत कोकाटे, प्रभारी सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड अलिबाग, महाविद्यालयाचे चेअरमन धनराज विसपुते तसेच प्राचार्य डॉ. आशिष जैन यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी, अप्रेंटिसशिप तसेच उद्योजकतेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

रोजगार मेळाव्यात मॅन्युफॅक्चरिंग, औषधनिर्माण, पॅकेजिंग, ऑटोमोबाइल, मानव संसाधन तसेच इतर विविध औद्योगिक क्षेत्रांतील उद्योग-आस्थापनांनी सहभाग नोंदविला. मेळाव्यात २८० विद्यार्थी व युवकांनी सहभाग घेत रोजगाराच्या संधी, व शासकीय योजनांची माहिती मिळविली.



## तळा बाजारात अळंबी दाखल

**तळा : प्रतिनिधी**

तळा बाजारपेठेत आंळबी दाखल झाली असून ५० रूपयांना एक वाटा विकला जात आहे. तळा तालुका हा डोंगराळ दुर्गम भाग असून आदिवासी समाजही याभागात राहत आहे.हा आदिवासी समाज आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी रानोमाळ फिरून आंळबीचा शोध घेऊन ती आंळबी मोठ्या कष्टाने जमा करतो व सात ते आठ वाटे होतील एव्हढी अळंबी जमली की ती घेऊन बाजारात विक्रीसाठी येत असतो.

बाजारात विक्रीसाठी हा समाज पुर्वपारंपार चालत आलेल्या पळसाच्या पानावर अथवा इतर पानावरती हे वाटे विक्रीसाठी ठेवतात. ग्राहकांची मोठी गर्दी खरेदीसाठी होतांना पहावयास मिळाली आहे.वाट्यांमधे फुललेली आळंबी ४० रूपये वाटा व मुकी अळंबी (बीन फुललेली)५० रूपयांना वाटा विकला जात आहे.अंदाजे ६०० ते १००० रूपये होतात.अंदाजे या पंधरा दिवसांच्या कालावधीत व्यवसाय चालत असल्याचे विक्रेते आदिवासी म्हणाले.

आज बाजारामध्ये ठिकठिकाणी आंळबी आल्याचे चित्र पहावयास मिळत होते.सदर बाबतीत एका ग्राहकासी संवाद साधला असता म्हणाले की ही आंळबी आपण सर्वजण घेत आहोत कारण हि आंळबी पाऊस पडल्यानंतर दहा पंधरा दिवसांत बाजारात येत असते ती ताजी व त्यामधे जीवनसत्व ,औषधी गुण चांगले असून चव ही चांगली असते.त्यामुळे तीला अधिक मागणी होत असते.हा हंगाम दहा बारा दिवसांचा असतो.



## ‘सीकेटी’त कालिदास दिन उत्साहात साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्समहाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने बुधवारी (दि.१५) महाकवी कालिदास दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रो. (डॉ.) बी. डी. आघाव व इतर प्राध्यापकवृंद उपस्थित होते. यावेळी प्रो.(डॉ.) बी. डी. आघाव आणि डॉ. (सौ.) आर. डी. म्हात्रे यांनी महाकवी कालिदास यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यानंतर डॉ. (सौ.) आर. डी. म्हात्रे यांनी महाकवी कालिदास यांचा जीवनपट व त्यांनी निर्माण केलेले अजरामर साहित्य याबद्दल माहिती देऊन महाकवी कालिदास यांचे भारतीय ज्ञानप्रणालीमधील महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यानंतर द्वितीय वर्ष इतिहास विषयाची विद्यार्थिनी कु. गौरी विरशेट्टी हिने महाकवी कालिदास यांच्या जन्मापासून ते त्यांनी रचलेल्या अजरामर संस्कृत साहित्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रमात इतिहास विभागाच्या ८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बी. ए. भोईर यांनी, तर आभार प्रदर्शन तृतीय वर्ष इतिहासाची विद्यार्थिनी कु. अनिता घाची हिने केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.(डॉ.) एस. के. पाटील, आय.क्यू. ए. सी. समन्वयक प्रो. (डॉ.) बी. डी. आघाव तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागांचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापकवर्गाने शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, यांनी कौतुक केले.

## खारघर येथे आज पर्यावरणपूरक शवदाहिनीचे लोकार्पण व प्राणी अंत्यसंस्कार केंद्राचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने खारघर सेक्टर-१४ येथील हिंदू स्मशानभूमीत उभारण्यात आलेल्या पर्यावरणपूरक शवदाहिनीचे लोकार्पण तसेच प्राणी अंत्यसंस्कार केंद्राच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील असतील.कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे तसेच रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.याबरोबरच सर्व लोकप्रतिनिधी, पनवेल महानगरपालिकेचे सर्व सदस्य आणि विविध मान्यवर , या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी नागरिकांनी या लोकार्पण व भूमिपूजन कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ३५९
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ शुक्रवार, १७ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## ‘महाराष्ट्राला सर्वाधिक सुलभ शासकीय सेवा देणारे राज्य बनवा’



**मुंबई :** राज्य शासनाच्या गव्हर्नन्स प्रोसेस रि-इंजिनियरिंग (जीपीआर) उपक्रमांतर्गत शासकीय सेवा अधिक सुलभ, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित करण्याच्या प्रक्रियेला गती देण्यात येत असून सर्व विभागांनी १५ ऑगस्टपर्यंत भरीव प्रगती करावी तसेच प्रत्येक सेवेचे नव्याने पुनरावलोकन करून कागदपत्रांची संख्या कमी करावी. महाराष्ट्राची “सर्वाधिक सुलभ शासकीय सेवा देणारे राज्य” अशी ओळख निर्माण करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जीपीआरच्या तिसऱ्या टप्प्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच मंत्रालयातील सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# कर्जत-लोणावळा रेल्वेमार्ग पूर्ववत

## आजपासून अनेक एक्स्प्रेस गाड्या पुन्हा धावणार

**मुंबई : प्रतिनिधी**

कर्जत-लोणावळादरम्यानच्या मध्य रेल्वेच्या दक्षिण-पूर्व डाऊन मार्गावरील रेल्वेसेवा पूर्णपणे पूर्ववत करण्यात आली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून बदललेल्या मार्गाने धावणाऱ्या किंवा अंशतः रद्द करण्यात आलेल्या अनेक महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्या आता पुन्हा त्यांच्या मूळ मार्गावर धावणार आहेत. मध्य रेल्वेने याबाबत अधिकृत माहिती दिली.



मध्य रेल्वेच्या पथकाने १४ जुलै रोजी दक्षिण-पूर्व डाऊन मार्गिका सुरू केली. यापूर्वी ७ जुलै रोजी मध्य मार्गिका सुरू करण्यात आली होती. दोन्ही मार्ग सुरू झाल्याने रेल्वे वाहतूक आता टप्प्याटप्प्याने सुरळीत होत आहे.

१७ जुलैपासून बंगळुरू-सीएसएमटी उद्यान एक्स्प्रेस आणि सोलापूर-सीएसएमटी सिद्धेश्वर एक्स्प्रेस या गाड्या पुन्हा मुंबईपर्यंत धावतील तसेच १८ जुलैपासून सीएसएमटी-बंगळुरू उद्यान एक्स्प्रेस आणि सीएसएमटी-सोलापूर सिद्धेश्वर एक्स्प्रेस या गाड्या पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सुटतील.

याशिवाय यापूर्वी रद्द करण्यात आलेली महालक्ष्मी एक्स्प्रेसही पुन्हा सुरू करण्यात आली आहे. सीएसएमटी-कोल्हापूर महालक्ष्मी एक्स्प्रेस १८ जुलैपासून, तर कोल्हापूर-सीएसएमटी महालक्ष्मी एक्स्प्रेस १९ जुलैपासून मूळ मार्गावर धावणार आहे.

अहमदाबाद-तिरुचिरापल्ली एक्स्प्रेसलाही पुन्हा मूळ मार्गावरून चालवले जाणार आहे. दरम्यान, डेक्कन क्वीन आणि इंटरसिटी एक्स्प्रेस या गाड्यांची सेवा १६ जुलैपासूनच पूर्ववत करण्यात आल्याचे मध्य रेल्वेने स्पष्ट केले आहे.

### दरड हटविण्याचे काम पूर्ण

लोणावळा-कर्जत घाट विभागात दरड हटविण्याचे काम रेल्वे प्रशासनाने आव्हानात्मक परिस्थितीत पूर्ण केले. रेल्वेचे कर्मचारी कठीण भौगोलिक परिस्थितीत दिवसरात्र काम करून मार्ग वाहतुकीसाठी सुरक्षित करण्यात यशस्वी झाले. गाड्यांच्या वेळापत्रकाबाबत अधिक माहितीसाठी प्रवाशांनी रेल्वे हेल्पलाइन किंवा एनटीईएस ॲपचा वापर करावा तसेच मध्य रेल्वेच्या अधिकृत सोशल मीडिया माध्यमांवरही नियमित अपडेट्स दिले जात असल्याचे रेल्वे प्रशासनाने माहिती देत सांगितले.

# एसआयआर अभियान यशस्वी करा!

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे आवाहन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकशाहीमध्ये एकही पात्र नागरिक मतदानापासून वंचित राहू नये यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय होऊन घराघरात जावे, नागरिकांशी थेट संपर्क साधावा आणि नाव नोंदणीसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची योग्य माहिती देऊन विशेष मतदार पुनरीक्षण (एसआयआर) अभियान पूर्ण ताकदीने यशस्वी करावे, असे आवाहन भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

राज्यभर सुरू असलेल्या एसआयआर अभियानाच्या अनुषंगाने पनवेल विधानसभा क्षेत्राची बैठक आकुर्लीतील काकाजीनी वाडी येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. लोकशाही अधिक सक्षम आणि प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदार यादीत समावेश व्हावा यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीला भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर, **(पान ५ वर..)**

## अर्नाळा समुद्रात चार मुले बुडाली

### दोघे बचावले, इतर दोन जण बेपत्ता

**विरार : प्रतिनिधी**

विरारजवळील अर्नाळा येथील समुद्रात गुरुवारी (दि.१६) नालासोपाऱ्यातील चार मुले बुडाली. समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या पोलिसांच्या सतर्कतेमुळे दोघांना वाचवण्यात यश आले, तर दोन मुले बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे.

अबुल हसमुद्दीन शेख, मोसाद अफसर खान, शोएब खान आणि अयान जाकीर हुसेन अशी १४ ते १७ वयोगटातील मुले अर्नाळा येथे फिरण्यासाठी आली होती. किनाऱ्यावर पोलिसांनी त्यांना हटकले आणि समुद्रात जाऊ नका, असे सांगितले, पण पोलीस पुढे निघून गेल्यानंतर मुले समुद्रात उतरली. जोरदार लाटांमुळे पाण्यात बुडू लागताच मुलांनी आरडाओरड सुरू केली. त्यांचा आवाज ऐकून पोलीस, होमगार्ड यांनी समुद्रात उड्या मारल्या. यापैकी अबुल आणि मोसाद या दोन मुलांना बाहेर काढण्यात यश आले. इतर दोघे शोएब आणि अयान लाटांमध्ये दिसेनासे झाले. जीवरक्षक दलाचे जवान त्यांचा शोध घेत असून शोधमेहिमेत अडथळे येत आहेत.

# प्रात्यक्षिक प्रशिक्षणामुळे विद्यार्थी देशविकासात योगदान देतील

## ■ लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन; ‘रयत’च्या इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल एक्सलन्सचे उद्‌घाटन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

प्रात्यक्षिक प्रशिक्षण, उद्योगाभिमुख शिक्षण आणि दर्जेदार अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहतील तसेच देशाच्या आर्थिक विकासातही मोलाचे योगदान देतील, असा विश्वास रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला. कामोठे येथे ‘रयत’च्या इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल एक्सलन्सच्या उद्‌घाटन समारंभात ते बोलत होते.




बदलत्या आधुनिक अर्थव्यवस्थेच्या गरजा लक्षात घेऊन आणि उद्योगाभिमुख व्यावसायिक शिक्षणाद्वारे तरुणांना सक्षम करण्याच्या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेने कामोठे येथे इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल एक्सलन्सची स्थापना केली आहे. संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकार झाला आहे. येत्या ऑगस्टपासून येथे विविध कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू होणार असून विद्यार्थ्यांना जागतिक रोजगाराच्या संधींसाठी सक्षम बनविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या सोहळ्याला युएसडीसी टेक्नॉलॉजीचे संचालक हुसेन हाजिते, पनवेलच्या महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, ‘रयत’चे रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी आदी उपस्थित होते. प्रारंभी डॉ. शुभदा नायक यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

# पनवेल मनपात विविध विषयांवर महत्त्वपूर्ण बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास आणि नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत महापालिकेमध्ये गुरुवारी (दि.१६) महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत पाणीटंचाई, रखडलेले प्रकल्प यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर चर्चा करण्यात आली.



या बैठकीला महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते ॲड.प्रकाश बिनेदार, स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम, माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, प्रवीण पाटील, सुमित झुंजारराव, अजय बहिरा, शत्रुघ्न काकडे, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

यावेळी वाढीव न्हावा शेवा पाणीपुरवठा योजना टप्पा-३ची सद्यस्थिती आणि अंमलबजावणी यावर प्रामुख्याने चर्चा झाली. त्याचप्रमाणे शिलार धरण उभारणीसाठी आवश्यक आर्थिक नियोजन करणे, देहरंग धरणातून केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेऊन त्याबाबत योग्य उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. पाणीपुरवठ्यासोबतच पनवेल महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टीवासीयांचे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पुनर्वसन करण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. याशिवाय पनवेलमध्ये ज्या ठिकाणी रेल्वे फाटक नाही अशा ठिकाणी महारेलमार्फत दोन नवीन उड्डाणपूल बांधण्याबाबत चर्चा करून पुढील रूपरेषा ठरवण्यात आली.

# पावसाच्या लपंडावामुळे राज्यातील जलसंकट कायम

**मुंबई : प्रतिनिधी**


राज्याच्या बहुतांश भागात गेल्या आठवड्यात पावसाने दमदार हजेरी लावली असली तरी पाणीटंचाईचे संकट अद्याप पूर्णपणे दूर झालेले नाही. प्रमुख धरणक्षेत्रात काही प्रमाणात पाऊस झाल्याने पाणीसाठ्यात किरकोळ वाढ झाली, मात्र राज्यातील प्रमुख १० धरणांतील उपयुक्त पाणीसाठा गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल १२ टक्क्यांनी कमी आहे.

राज्यातील २२ जिल्ह्यांतील ७३७ गावे आणि एक हजार ९१८ वाड्यांना आजही ७९० टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. पावसाने पुन्हा ओढ दिल्यास राज्यात पाणी आणीबाणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

राज्यातील कोयना, जायकवाडी, उजनी, पेंच प्रकल्प समूह, गोसीखुर्द, खडकवासला, मुठा, अप्पर वर्धा, भंडारदरा आणि इसापूर या प्रमुख १० धरणांमध्ये सध्या १८४.४७ टीएमसी (४५ टक्के) उपयुक्त पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी याच काळात हा साठा २७८.४४ टीएमसी इतका होता. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा पाणीसाठा घटल्यामुळे चिंता वाढली आहे. नाशिक विभागात पाण्याची परिस्थिती अधिकच गंभीर असून तिथे सर्वाधिक ३०० टँकर्सद्वारे पाणी पुरवले जात आहे. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये पावसाचे प्रमाण अद्याप समाधानकारक नसल्याचे चित्र आहे.

## आणखी एका वारकरी महिलेचा मृत्यू

**पुणे :** जेजुरीजवळ ट्रकच्या धडकेत तीन वारकरी महिलांचा सोमवारी मृत्यू झाला होता. या अपघातातील गंभीर जखमी शैलजा दिनकर जगताप या वारकरी महिलेचा गुरुवारी (दि.१६) उपचारादरम्यान मृत्यू झाला.




## निवडक

### जगन्नाथ रथयात्रेत चेंगराचेंगरी; दोघांचा मृत्यू, अनेक जण जखमी

**पुरी :** ओडिशामधील पुरी येथील प्रसिद्ध जगन्नाथ रथयात्रेदरम्यान गुरुवारी (दि.१६) चेंगराचेंगरीसदृश्य परिस्थिती उद्‌भवल्याने दोन भाविकांचा मृत्यू झाला आहे तसेच अनेक भाविकांना श्वास घेण्यास त्रास जाणवत असल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना बडा दंडा अर्थात ग्रँड रोड येथे घडली. या ठिकाणी भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांचे रथ ओढताना पाहण्यासाठी भाविकांचा जनसागर लोटला होता.

### पर्यटकांवर हल्ला करणारे मुख्य आरोपीही अटकेत

**इगतपुरी :** इगतपुरीतील भावली परिसरात गेलेल्या पर्यटकांना मारहाण करून फरार असलेल्या मुख्य तीन आरोपींच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. आकाश भोईर, कैलास भागडे, तुषार कडू अशी या आरोपींची नावे आहेत. विशेष म्हणजे दुचाकीवर बुरखा घालून फिरत असताना त्यांना पकडण्यात आले. दरम्यान, याप्रकरणी आधीच नऊ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# रायगडात यंदा केवळ १.६७ टक्के क्षेत्रावर भात लागवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

अनियमित आणि अनियंत्रित पावसामुळे खरीप हंगामातील भातशेती संकटात सापडली आहे. आधी लांबलेल्या पावसामुळे, तर नंतर अतिवृष्टीमुळे शेती अडचणीत सापडली आहे. अर्धा जुलै सरला असला तरी भाताचे कोठार अशी ओळख असलेल्या रायगड जिल्ह्यात एकूण लागवड क्षेत्राच्या केवळ १.६७ टक्के क्षेत्रावर भात लागवड करण्यात आली आहे. पावसाने दडी दिल्याने भात लागवड संथगतीने सुरू आहे.

रायगड जिल्ह्यात जवळपास ९० हजार हेक्टर भात लागवडीखालील क्षेत्र आहे, मात्र गेल्या काही वर्षांपासून या लागवड क्षेत्रात सातत्याने घट होत चालली आहे. यास वाढते शहरीकरण आणि औद्योगिकरण कारणीभूत ठरले आहे. यंदा त्यात निसर्गाच्या लहरीपणाची भर पडण्याची चिन्हे दिसत आहेत. गेल्या वर्षी जवळपास ७१ हजार हेक्टरवर भात लागवड करण्यात आली होती. यावर्षी तेवढ्या क्षेत्रावरही भात लागवड होईल की नाही याबाबत साशंकता आहे.



### रोपवाटिकांचे नुकसान

जुलै महिन्याच्या पहिल्या आठ दिवसांत अतिवृष्टी झाली. त्यामुळे सुमारे दोन हजार १०० हेक्टरवरील भाताच्या रोपवाटिका नष्ट झाल्या आहेत. या ठिकाणी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे. दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जि.प.च्या सेस फंडातून ७५ टक्के अनुदानातून बियाणे देण्यात येत आहेत.

जिल्ह्यातील ९१ हजार ५२०.७२ हेक्टर सरासरी भात क्षेत्रापैकी केवळ १ हजार ५२७.४९ हेक्टर (१.६७ टक्के) क्षेत्रावर लागवड पूर्ण झाली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत २.१३ टक्के क्षेत्रावर लागवड झाली होती. त्यामुळे यंदा भात लागवड गेल्या वर्षाच्या तुलनेतही मागे असल्याचे कृषी विभागाच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. तालुकानिहाय पाहता उरण तालुक्यात सर्वाधिक २४.४६ टक्के क्षेत्रावर लागवड झाली आहे. त्याखालोखाल सुधागडमध्ये ६.५९ टक्के आणि तळा तालुक्यात ५.९४ टक्के लागवड झाली आहे. तर पोलादपूर, मुरुड, कर्जत, पनवेल आणि महाड या तालुक्यांमध्ये लागवडीचे प्रमाण अत्यल्प आहे. ही एक चिंताजनक बाब आहे.

जिल्ह्यात १० जुलैपर्यंत झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक शेतांमध्ये पाणी साचले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना लागवड करता आलेली नसून पाणी ओसरल्यानंतरच पुनर्लागवडीला वेग येणार आहे. कृषी विभागाच्या मते पुढील काही दिवस हवामान अनुकूल राहिल्यास जिल्ह्यातील भात लागवडीचा वेग वाढण्याची अपेक्षा आहे.

## संपादकीय

# गरज सायबर सज्जतेची

भारतातील कुडनकुलम या सर्वात मोठ्या अणुऊर्जा प्रकल्पाशी संबंधित डेटाची चोरी झाल्याचे प्राथमिक माहितीत समोर आले असले तरी या डेटाचोरीचा अणुसुरक्षेशी काहीही संबंध नाही असे वरिष्ठ स्तरावरून स्पष्ट करण्यात आले आहे. ‘वर्ल्ड लीक्स’ या सायबर गुन्हेगारांच्या टोळीने कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्पाशी संबंधित फाइल डार्क वेबवर पोस्ट केल्या आहेत असे वृत्त एका विदेशी वृत्तवाहिनीने दिले होते.

**जगभरात आज सायबर हल्ले हे नव्या युद्धनीतीचा महत्त्वाचा भाग झाले आहेत. सरकारे, संरक्षण संस्था, वित्तीय संस्था आणि ऊर्जा प्रकल्पांसारखे महत्त्वाचे प्रकल्प हे अशा हल्लेखोरांचे प्रमुख लक्ष्य असतात. त्यामुळे तमिळनाडूतील कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्पाशी संबंधित डेटा चोरी करून तो डार्क वेबवर पोस्ट करण्यात आल्याची घटना समोर येताच स्वाभाविकपणे चिंता व्यक्त करण्यात आली. मात्र, या डेटाचोरीचा अणुसुरक्षेशी काहीही संबंध नाही हे बुधवारीच वरिष्ठ स्तरावरून स्पष्ट करण्यात आले. अणुभट्ट्यांच्या सुरक्षेशी किंवा अणुसुरक्षा प्रणालींशी संबंधित कोणतीही संवेदनशील माहिती या डेटाचोरीमुळे उघड झालेली नाही हे केंद्र सरकार तसेच न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने स्पष्ट केले. हे प्रकल्प प्रणालीच्या सर्वसामान्य सेवेशी संबंधित आहेत. त्याचा अणुसुरक्षा आणि संरक्षणाशी कोणताही संबंध नाही असेही एनपीसीआयएलकडून स्पष्ट करण्यात आले आहे. अर्थात तसे असले तरी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू झाला आहे. अशा कोणत्याही घटनेकडे राजकीय चष्म्यातून वा भावनिकदृष्ट्या न पाहता वस्तुनिष्ठपणे पाहणे अधिक आवश्यक असते. प्राथमिक माहितीनुसार ही डेटाचोरी प्रकल्पाशी संबंधित काही कंत्राटी माहितीपुरती मर्यादित आहे. अशा हल्ल्याचे वेळी संबंधित संस्था किती वेगाने हल्ला रोखतात, नुकसान मर्यादित ठेवतात आणि भविष्यातील सज्जतेच्या दृष्टीने कोणती सुधारणा करतात हे अधिक महत्त्वाचे असते. भारतानेही या घटनेनंतर तत्परतेने चौकशी सुरू केली असून यात तज्ज्ञ संस्थांचा सहभाग आहे. अशा संवेदनशील विषयावरही काही विरोधी पक्षांकडून समाज माध्यमांवरून भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होतो हे मात्र कदापि योग्य नव्हे. राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विषयांवर राजकारण करण्यापेक्षा सरकारच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहून जबाबदार भूमिका घेणे अपेक्षित असते. अणुऊर्जा प्रकल्पासारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांबाबत अनावश्यक अफवा किंवा अतिरंजित दावे जनतेमध्ये संभ्रम निर्माण करतात. मोदी सरकारने गेल्या काही वर्षांत सायबर सुरक्षेला राष्ट्रीय प्राधान्य दिले आहे. महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या संरक्षणासाठी विविध सुरक्षा प्रोटोकॉल, सातत्यपूर्ण ऑडिट, डिजिटल देखरेख आणि संस्थांमधील समन्वय अधिक मजबूत करण्यावर भर दिला जातो आहे. सायबर सुरक्षा ही सतत विकसित होत राहणारी प्रक्रिया आहे. सरकारी संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, खासगी कंत्राटदार आणि सेवा पुरवठादार यांनी समान दर्जाची सुरक्षा पाळली पाहिजे. पुरवठा साखळीतील एखादी कमकुवत कडीही राष्ट्रीय सुरक्षेवर परिणाम करू शकते. त्यामुळे नियमित सुरक्षा चाचण्या, तांत्रिक गुंतवणूक, कर्मचारी प्रशिक्षण आणि कठोर उत्तरदायित्व यावर भर देणे गरजेचे आहे. भारत अणुऊर्जा क्षमता वाढविण्याच्या महत्त्वाकांक्षी वाटचालीवर आहे. त्यामुळे संबंधित सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. संभ्रमाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण करण्याऐवजी तपास पूर्ण होऊ देणे आणि सायबर संरक्षण अधिक मजबूत करणे हेच याबाबतीत राष्ट्रहिताचे आहे.**

# आदिवासी समाजाचे जनसेवक आमदार महेश बालदी



गेली २५ वर्षे मी सामाजिक क्षेत्रात काम करीत आहे. विशेषतः आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या विविध योजना राबविण्याचा प्रयत्न करत आहे. सामाजिक संस्थांची मदत घेऊन या समाजाचे प्रश्न समजून घेत ते सोडविण्याचा प्रयत्न करत आहे. राजकारण हा माझा विषय नव्हता आणि आजही नाही, परंतु गेल्या काही निवडणुका पाहिल्या आणि अनुभवल्या; त्यामधून एक गोष्ट निदर्शनास आली ती म्हणजे प्रस्थापित पुढारी केवळ निवडणुकीपुरता आदिवासी मतदारांचा वापर करायचे आणि निवडणूक संपल्यावर त्यांच्या समस्या सोडविण्याकडे मात्र लक्ष देत नव्हते. उरण विधानसभा मतदारसंघात आमदार महेश बालदी यांनी त्याला छेद देत आदिवासी बंधू-भगिनींशी कायमची नाळ जोडली आहे.

आमदार म्हणून निवडून आल्यानंतर महेश बालदी यांनी सर्वात प्रथम उरण तालुक्यातील रानसई येथील सहा आदिवासी वाड्यांचा रस्ता आणि विजेचा प्रश्न सोडविला. खालापूर तालुक्यातील चौकजवळील इरशाल वाडीवर जेव्हा दरड कोसळली तेव्हा भर रात्रीत त्यांच्या मदतीसाठी धावून जाणारे आमदार महेश बालदी होते. या वाडीवर केवळ दरड पडली नव्हती, तर दुःखाचा डोंगर तेथील आदिवासी कुटुंबांवर पडला होता. अशा वेळी आमदार या नात्याने त्यांनी प्रसंगातून मार्ग काढत सातत्याने पाठपुरावा करून वाचलेल्या कुटुंबांचे एका वर्षभरात सरकारच्या मदतीने पुनर्वसन करून दिले. एखाद्या आदिवासी वाडीचा प्रश्न काय आहे याचा ते स्वतः अनुभव घेतात आणि मग तो प्रश्न सुटेपर्यंत पाठपुरावा करतात. आदिवासी समाजाचे प्रश्न हिरिरीने विधानसभेत मांडतात.

खालापूर तालुक्यातच हशाची पट्टी हे एक आदिवासी गाव आहे. एकदा या गावात गेलो की दुसऱ्या दिवसापासून पायांना पट्टी बांधून चालावे लागते. उंच डोंगरकड्यावर वसलेल्या या गावाला रस्ता नव्हता, कारण वन विभागाची अडचण होती. ही अडचण सोडविण्यासाठी आमदार महेश बालदी वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाच वाडीवर घेऊन गेले आणि खाली उतरताना आदिवासींना सांगून आले "आता तुमच्या वाडीवर येताना चार चाकी गाडी घेऊनच येणार." काही महिन्यांपूर्वी वनविभागाने या रस्त्याला मंजुरी देऊन अर्धा रस्ता पूर्ण झाला आहे. येणाऱ्या काळात उर्वरित अर्धा रस्तादेखील पूर्ण होईल याबाबत माझ्या मनात शंका नाही.

कर्नाळा किल्ल्याच्या पायथ्याशी घेरावाडी म्हणून एक आदिवासी वस्ती आहे. स्वातंत्र्यानंतर इतकी वर्षे उलटून गेली तरी या वस्तीला रस्ता, वीज आणि पाणी यांसारख्या प्राथमिक सुविधादेखील नव्हत्या. आमदार महेश बालदी यांनी मंत्रालय स्तरावर विधानसभेत त्यांचा प्रश्न मांडून आज या वस्तीला २४ तास पिण्याचे पाणी आणि विजेची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. येणाऱ्या काळात रस्तादेखील होईल हा विश्वास येथील आदिवासींना वाटतो. एकदा मनात ठरविले की तो प्रश्न सुटेपर्यंत आमदारसाहेब शांत बसत नाहीत, हा त्यांचा स्वभाव आहे. त्यांच्या भेटीसाठी आमच्या आदिवासींना कोणत्याही मोठ्या कार्यकर्त्याला सोबत घेऊन जाण्याची गरज वाटत नाही. आदिवासी स्वतःच त्यांची भेट घेऊन आपला प्रश्न मांडत असतात. मग गरिबातल्या गरीब आदिवासीला जवळ घेऊन त्यांच्या खांद्यावर आपुलकीने आमदारसाहेब हात ठेवतात, त्यांच्यासोबत फोटो काढतात, त्यांना चहा-नाश्ता देऊन विचारपूस करतात, त्यांची समस्या जाणून घेतात आणि समाधानाने घरी पाठवतात हे काही आदिवासींनीच सांगितले.

एक दिवस आमदारसाहेबांची भेट घेऊन आदिवासींच्या कुडा मेडीच्या कच्च्या घरांची यादी त्यांच्याकडे दिली आणि यांची पक्की घरे मंजूर करावी, अशी विनंती केली. आमदारसाहेबांनी ही फाईल हातात घेतली, काही दिवस जाऊ दिले आणि "माझे एकही आदिवासी कुटुंब कुडा मेडीच्या कच्च्या घरात राहणार नाही, त्यांना पक्की घरे मंजूर करणार," असे वचन त्यांनी दिले आणि काही महिन्यांतच मतदारसंघातील हजारो आदिवासी कुटुंबांना पक्की घरे मंजूर करून आज प्रत्येक आदिवासीवाडीवर पक्की घरे बांधण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

आदिवासी समाजात आरोग्याचा प्रश्न फार बिकट आहे. दुर्गम भागात तर तो अधिक गंभीर असतो. बहुतांशी आजारी माणसं प्राथमिक इलाजदेखील करत नाहीत. बऱ्याचदा घरगुती उपचार करत असतात. कित्येक दिवस तर आजार अंगावरच काढला जातो. काही ठिकाणी दवाखानेदेखील वस्तीपासून लांब अंतरावर आहेत. बहुतांश रुग्णांकडे प्राथमिक उपचार करण्यासाठीसुद्धा पैसे नसतात. ही बाब लक्षात घेऊन आमदारसाहेबांनी आदिवासी वाड्या-वस्त्यांवर फिरता दवाखाना सुरू केला आहे. उरण मतदारसंघातील किमान १००हून अधिक आदिवासी वाड्यांवर एका अनुभवी डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी करून मोफत औषधे दिली जातात. गेली चार वर्षे अखंडितपणे हा उपक्रम सुरू आहे. इतक्यावरच ते थांबले नाहीत, तर गंभीर आजारातून बरे करण्यासाठी मोठमोठ्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झालेल्या रुग्णांच्या नातेवाइकांना धीर देऊन शासनाच्या वैद्यकीय योजनांचा लाभ मिळवून दिला जातो तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी मिळविण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करून आजपर्यंत एक कोटींहून अधिक रुपयांची मदत आमदारसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली केली गेली आहे.

बहुतांश आदिवासी समाजाचे उपजीविकेचे मुख्य साधन हे मोलमजुरी आहे, मात्र ती नियमित मिळेल याची खात्री नाही. यासाठी वीटभट्टी तसेच भाजीपाला पिकवणारी कुटुंब वर्षातील सात-आठ महिने आपल्या मुलाबाळांसह स्थलांतर करतात. अशा वेळी मुलांना शिक्षण देत बसलो तर पोटापाण्याचे कसे करणार? प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर दूरवर असणाऱ्या माध्यमिक शाळेत मुलांना कसे पाठवणार? विशेषतः मुलींना एवढ्या दूरवर शाळेत पाठविण्याची टाळाटाळ केली जाते. ही बाब आमदारसाहेबांच्या लक्षात आल्यानंतर खालापूर तालुक्यातील एका विभागात आदिवासी मुला-मुलींसाठी मोफत स्कूल बससेवा त्यांनी सुरू केली. आज अनेक विद्यार्थी या बसमधून प्रवास करून वेळेवर शाळेत जा-ये करतात. आमदारसाहेबांच्या या उपक्रमाची प्रेरणा घेऊन त्यांच्याच नावाने त्यांच्या एका सहकाऱ्याने पनवेल तालुक्यातील नानोशी गराडा विभागात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी दुसरी बससेवा सुरू केली. माझा आदिवासी समाज हा पूर्वजांमुळे मागे राहिला, पण या समाजाला मूलभूत सेवासुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी आठवड्यातील एक दिवस केवळ आदिवासींसाठी देणारा पहिला आमदार महेश बालदी यांच्या रूपात मी पाहिला. काही ठिकाणी तर आदिवासींच्या अशा समस्या होत्या की स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी कोणी त्या सोडविल्या नाहीत. अशा कठीण समस्यांना हात घालून त्या सोडविल्याशिवाय गप्प बसायचे नाही हा या कार्यतत्पर लोकप्रतिनिधीचा छंद आहे. विशेष म्हणजे हे करत असताना त्यांनी कधीच मतांचे राजकारण केले नाही. आदिवासी समाजासाठी काम करणाऱ्या या जनसेवकाला म्हणजेच आमदार महेश बालदी यांना आई जगदंबेच्या कृपेने उदंड आयुष्य आणि उत्तम आरोग्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**-रायगड भूषण रत्नाकर घरत,**
**सामाजिक कार्यकर्ते**



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाइलचा ‘ब्लू लाईट’ डोळ्यांसाठी किती धोकादायक?

रात्री उशिरापर्यंत रील्स, काम, वाचन किंवा गेमिंगसाठी मोबाइल स्क्रोल करणे आता सवय झाली आहे. स्क्रीनवरून निघणाऱ्या निळ्या प्रकाशाला ‘ब्लू लाईट’ म्हणतात. यामुळे डोळे आणि झोप या दोन्हींवर परिणाम होतो का, असा प्रश्न अनेकांना पडतो. नेत्ररोगतज्ज्ञांच्या मते ब्लू लाईट स्वतःमध्ये डोळ्यांना थेट इजा करत नाही, मात्र त्याचे प्रमाण आणि वापराचा कालावधी महत्त्वाचा आहे. दिवसभर स्क्रीनकडे टक लावून बघितल्याने डोळे कोरडे होतात, जळजळ होते, धूसर दिसते आणि डोकेदुखी होते. याला ‘डिजिटल आय स्ट्रेन’ म्हणतात.



कारण आपण स्क्रीन बघताना नेहमीपेक्षा ६० टक्के कमी वेळा डोळे मिचकावतो. ब्लू लाईटचा सर्वात मोठा परिणाम झोपेवर होतो. रात्री झोपण्याच्या दोन तास आधी मोबाइल वापरल्यास मेंदूमध्ये मेलाटोनिन हे झोपेचे हार्मोन कमी तयार होते. त्यामुळे झोप उशिरा येते आणि सकाळी थकवा जाणवतो. लहान मुले आणि तरुणांमध्ये याचा परिणाम जास्त दिसून येतो. म्हणून डोळे वाचवण्यासाठी काही सोपे नियम पाळता येतील. पहिला नियम २०-२०-२० आहे. दर २० मिनिटांनी २० सेकंदासाठी २० फूट लांब बघावे. यामुळे डोळ्यांच्या स्नायूंना आराम मिळतो. दुसरा, स्क्रीनची ब्राइटनेस खोलीच्या प्रकाशानुसार ठेवावा. अंधारात पूर्ण ब्राइटनेसवर मोबाइल वापरू नये. तिसरा नाईट मोड किंवा ब्लू लाईट फिल्टर सुरू करावा. संध्याकाळनंतर स्क्रीनचा पिवळसर रंग डोळ्यांना कमी त्रास देतो. चौथा अंतर ठेवावे. मोबाइल डोळ्यांपासून किमान १६ ते १८ इंच लांब असावा आणि स्क्रीन थोडा खाली असावा. पाचवा दर तासाला पाच मिनिटांचा ब्रेक आणि मुबलक पाणी पिणे गरजेचे आहे. अँटी-ग्लेअर चष्मा किंवा स्क्रीन गार्डने थोडा फायदा होतो, पण सवयी बदलणे हेच खरे उत्तर आहे. दिवसातून किमान दोन वेळा १० मिनिटे बाहेर निसर्गाकडे बघणे डोळ्यांसाठी खूप चांगले असते. दरम्यान, आपली दृष्टी निरोगी राखण्यासाठी आपणच प्रयत्न करणे अतिशय महत्त्वाचे आहे. काही साध्या सोप्या गोष्टींचा अवलंब करून आपण आपली दृष्टी चांगली ठेवू शकतो. त्यात योग्य आहार घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

# आज आंतरराष्ट्रीय न्याय दिन



**निमित्त**

मानवतेला धोका निर्माण करणाऱ्या समस्येचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने या दिवसाची सुरुवात केली. समतेचा प्रसार करून अन्याय आणि भेदभाव नष्ट करणे हा त्याचा उद्देश आहे.

यामागचे कारण असे की, २०१० रोजी कंपाला (युगांडा)मध्ये झालेल्या रूम विधान कायद्याचा आढावा परिषदेत राज्य पक्षांच्या असेंब्लीने १७ जुलै हा आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाचा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. आंतरराष्ट्रीय न्यायाची मजबुतीकरण यंत्रणा ओळखण्यासाठी तसेच पीडितांच्या हक्कांना न्याय देण्यासाठी आंतरराष्ट्रीय न्यायासाठी जागतिक न्याय दिन दरवर्षी १७ जुलैला साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय न्यायासाठी जागतिक दिन हा रोम विधानचा ऐतिहासिक वापर आणि १९९८ मध्ये आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाची नवीन यंत्रणा स्थापनेच्या स्मरणार्थ साजरा केला जातो.

आधुनिक समाजात सर्व लोकांना समान संधी आणि सुविधा मिळाल्या पाहिजेत, हा केवळ सामाजिक न्यायाचा नाही तर सर्व देशांचा आदर्श आहे. सर्व लोकांच्या सामाजिक भूमिका पूर्ण व्हाव्यात आणि लोकांचे हक्क त्यांना दिले जावे. यासाठी समाजातील विविध संस्थांना अधिकार आणि कर्तव्ये दिली जातात, ज्यामुळे ही उद्दिष्टे साध्य होऊ शकतात, हेच सामाजिक न्यायाचे ध्येय आहे.

आंतरराष्ट्रीय न्याय दिन हा रोम विधानचा ऐतिहासिक वापर आणि १९९८ मध्ये आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाची नवीन यंत्रणा स्थापनेच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. १७ जुलै १९९८ रोजी १२० देशांनी एकत्र येऊन आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाचा रोम कायदा नावाच्या करारावर स्वाक्षरी केली. आणि १ जुलै २००२ रोजी हा कायदा लागू करण्यात आला. तेव्हापासून हा दिन साजरा केला जातो. एकूण देशांपैकी १२० देश या कराराच्या बाजूने होते. तर, २१ देश या कायद्याच्या विरोधात होते. यामध्ये चीन, इस्रायल, अमेरिका आणि इराक या देशांचा सहभाग होता.जागतिक न्याय दिनाचे उद्दिष्ट आयसीसीच्या (ICC) प्रयत्नांचे कौतुक करणे आणि आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांना बळी पडलेल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वांना एकत्र करणे हा आहे.

ICCने प्रामुख्याने मानवतेविरुद्धचे गुन्हे (संहार, खून इ.), नरसंहार (जाणूनबुजून एका समुदायाला हानी पोहोचवणे), युद्ध गुन्हे (इच्छुकपणे दुःख, छळ इ.) आणि आक्रमकतेचे गुन्हे (लष्करी व्यवसाय, संलग्नीकरण इ.) यावर लक्ष केंद्रित केले. हा दिवस अनेक संस्थांद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा केला जातो, तर या दिवशी युद्ध गुन्हेगारी पीडितांना श्रद्धांजली वाहून त्यांचे स्मरण केले जाते. आंतरराष्ट्रीय न्यायालय हे संयुक्त राष्ट्रसंघाचे एक अंग आहे. नेदरलँड्समधील हेग या शहरात हे न्यायालय स्थित आहे. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# जास्त झोपल्यावर शरीराचे गंभीर नुकसान

चांगल्या आरोग्यासाठी योग्य झोप खूप महत्वाची आहे हे आपल्या सर्वांना माहित आहे, झोपेशी संबंधित समस्या सहसा दोन प्रकारच्या असतात. पहिलं म्हणजे पूर्ण झोप न येणं आणि दुसरं म्हणजे जास्त झोप घेणं. या दोन्ही गोष्टी धोकादायक आहेत कारण यामुळे आपल्या शरीराचे गंभीर नुकसान होऊ शकते. कमी झोपणे आणि जास्त झोपणे दोन्ही हानिकारक आहे आणि त्याचा काय परिणाम होऊ शकतो हे जाणून घेऊया.



**आपण एका दिवसात किती झोप घ्यावी?**

जगभरात झालेल्या संशोधनानुसार निरोगी प्रौढ व्यक्तीने रात्रभर किमान ७ ते ८ तास झोप घेतली पाहिजे, तरच त्यांच्या शरीराची कार्ये व्यवस्थित काम करतील आणि समस्या उद्भवणार नाहीत.

जर तुम्हाला रात्रीच्या वेळेत नीट झोप येत नसेल तर त्याचा परिणाम दुसऱ्या दिवशी स्पष्टपणे दिसून येतो. यामुळे थकवा, सुस्ती, शरीर बिघडणे, ऊर्जेची कमतरता होऊ शकते. कमी झोपेमुळे हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका असू शकतो, असा दावाही अनेक आरोग्य तज्ज्ञ करतात.

आपल्या झोपेची वेळ निश्चित करा आणि वेळ, शेड्युल बदलण्याचा प्रयत्न करू नका. जास्त झोप घेतली किंवा आळशीपणामुळे शरीराचे अनेक प्रकारचे नुकसान होऊ शकते.

**नार्कोलेप्सी**

हा एक विचित्र झोपेचा विकार आहे ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीला दिवसा जास्त झोप येऊ लागते किंवा अचानक झोप येते. प्रवास करताना हा आजार धोकादायक ठरतो.

**स्लीप एपनिया**

यात श्वासोच्छवासावर वाईट परिणाम होतो आणि नियमित श्वासोच्छ्वास थांबतो. त्यामुळे आवश्यक तेवढी झोप घ्यावी.

**इडिओपॅथिक हायपर सोम्निया**

जे लोक इडिओपॅथिक हायपरसोम्नियाने त्रस्त असतात त्यांना दैनंदिन जीवनातील सामान्य क्रिया करताना खूप थकवा जाणवतो. एकूणच आपल्याला जर निरोगी आयुष्य हवे असेल तर झोपेचे योग्य व्यवस्थापन करणे अतिशय गरजेचे आहे. त्यामुळे आपला मूडदेखील चांगला राहण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे शरीराला पुरेशी झोप आवश्यक आहे.

# पेणमधील प्रमुख पर्यटनस्थळांवर जाण्यास पर्यटकांना बंदी!

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यासाठी हवामान विभागाने रेड/ऑरेंज अलर्ट जारी केल्याच्या पार्श्वभूमीवर आणि पेण तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे संभाव्य पूर, दरड कोसळणे व अपघातांचा धोका लक्षात घेऊन उपविभागीय दंडाधिकारी प्रवीण पवार यांनी पेण तालुक्यातील धोकादायक पर्यटनस्थळांच्या परिसरात ९ जुलै ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीसाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.



हवामान विभागाच्या इशाऱ्यानुसार अतिवृष्टीमुळे सखल भागात पूरस्थिती, नद्या-नाल्यांना पूर, दरड कोसळणे तसेच धबधबे व धरण परिसरात पर्यटक अडकण्याच्या घटना घडण्याची शक्यता आहे. पेण पोलीस ठाण्याने सादर केलेल्या अहवालानुसार मोतीराम तलाव, शहापाडा धरण, हेटवणे धरण, आंबेघर धरण, व्याघेश्वर धबधबा (कासमाळ) तसेच इतर नैसर्गिक पर्यटनस्थळांवर मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असून, निष्काळजीपणामुळे जीवितहानी होण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे मानवी जीवित व सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने कठोर निर्बंध लागू केले आहेत.

या आदेशानुसार धबधबे व धरण परिसरात मद्यपान, मद्यधुंद अवस्थेत प्रवेश, सेल्फी, रिल्स किंवा कोणत्याही प्रकारचे चित्रीकरण, खोल पाण्यात उतरणे, धबधब्याच्या वरच्या भागात जाणे, धोकादायक पाण्याच्या प्रवाहात बसणे, बेदरकार वाहनचालक, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशी वाहनांची पार्किंग, महिलांची छेडछाड, मोठ्या आवाजात डीजे, स्पीकर व ध्वनीवर्धकांचा वापर तसेच प्लास्टिक, काचेच्या बाटल्या व इतर कचरा टाकून प्रदूषण करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

याशिवाय स्थानिक प्रशासनाने प्रतिबंधित घोषित केलेल्या क्षेत्रात प्रवेश करणे, सुरक्षा बॅरिकेड्स किंवा कुंपण ओलांडणे यालाही मनाई करण्यात आली आहे.

# गणेशमूर्ती बनविण्यात मूर्तिकार मग्न

## शाडू मातीच्या मूर्तींना भाविकांची अधिक मागणी



**तळा : प्रतिनिधी**

श्री सद्गुरू कृपा गणेश कला मंदिरातील श्री गणेश मूर्तींना दूर दूर वरून होत आहे मागणी.यावर्षीच्या मागणीत वाढ झाली आहे.सात आठ दिवसांपूर्वी मुसळधार पाऊस पडला होता या पावसामुळे काहीसा कामात व्यत्यय आला होता मात्र पाऊस कमी झाल्यानंतर पुन्हा मुर्ती तयार करण्यास सुरुवात झाली आहे.

शाडूचीमाती,प्लास्टर ऑफ पॅरिस, रंगाचे भाव अंदाजे ३०% ने वाढल्याने मूर्तींच्या किंमतीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. शिल्पकारांनी मे महीन्यापासून तालुक्यात मुर्ती तयार करण्यास सुरुवात केली आहे.आजपर्यत या चित्रशिल्पालयात ७५५ गणेशमूर्ती घडवल्या आहेत.थोड्या कालावधीत रंगकाम करण्यास सुरुवात केली जाणार आहे.या गणेशमूर्ती तळा, माणगाव,रोहा,मुरूड,म्हसळा इत्यादी ठिकाणी जातात.

निवी येथील श्री सद्गुरू कृपा गणेश कला मंदिरचे मूर्तीकार तळ्यातील राजू खांडेकर यांच्याशी संवाद साधला असता.ते म्हणाले की आमच्या कारखान्यास सुरूवात करण्यापूर्वी इतर ठिकाणी रंगकाम व मूर्ती स्वतः हाताने घडवत होतो.नंतर स्वतःचा स्वतंत्र असं शिल्पालय असावं व त्यासाठी काम सुरू केले.सुरूवातीला कमी प्रमाणात मूर्ती तयार केल्या.गणेश भक्तांना मूर्ती आवडल्या आणि मागणीत वाढ होऊन आजच्या स्थितीत ७५५मुर्तीची मागणी आहे.त्यात शाडूच्या मूर्ती १२५ व ६३०प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती तयार केल्या आहेत.यावर्षी रंग,शाडूचीमाती ,व इतर साहित्याच्या किंमती वाढल्याने गणेशमूर्तीच्याही किंमतीत वाढ झाली आहे.१२ जून पासून मुर्ती तयार करण्यास सुरुवात झाली आहे.त्यातच गणेश भक्त सांगेल त्याप्रकारची मुर्ती तयार करून द्यावी लागते.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, वेश्वी ग्रामपंचायत हद्दीत मौजे वेश्वी, ता. उरण, जि. रायगड येथे सर्व्हे नंबर / हिस्सा नं. ९६/५, ४६/३, २५/६, २६/२, १७/२, ४२/७, ४४/२ अश्या वर्णनाची मिळकती आहेत. सदरहु मिळकती आमचे अशील मे. सिन्नर ॲग्रोव्हेट प्रा. लि. तर्फे श्री. शुभम अशोककुमार बालदी यांनी श्रीमती देऊबाई दत्तु मोहिते वगैरे यांचेकडुन कायम विकत घेण्याचे उद्देश्याने दिनांक ०७/०७/२०२२ रोजी नोंदणीकृत साठेकरार केलेला आहे. सदरचा साठेकरार मा. दुय्यम निबंधक उरण यांचे कार्यालयात अनुक्रमांक २३६७/२०२२ कडे दिनांक ०७/०७/२०२२ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. सदरहु साठेकरार नोंदणीकृत केल्यानंतर त्याबाबतची नोंदणी फी भरल्याची पावती, सदर मिळकतीबाबतचे साठेकराराची सुची क. २ चा उतारा तसेच साठेकराराची मुळ प्रत इ. कागदपत्र आमचे अशीलांस देण्यात आलेली होती. परंतु सदरहु कागदपत्र आमचे अशील दिनांक ०५ मे २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजताचे सुमारास उरण दिघोडे कंठवली असा प्रवास करीत असताना आमचे अशीलांकडुन नजरचुकीने व अनावधानाने हरवली आहेत. सदरहु कागदपत्रांचा शोध घेतला असता, ती आमचे अशीलांस आढळुन आलेली नाहीत. सबब आमचे अशीलांनी त्याबाबतची रितसर तक्रार उरण पोलिस स्टेशन दिनांक १६.०७.२०२६ रोजी दिलेली असुन ती Lost Property Registration No. ०५९३/२०२६ अन्वये नोंदलेली आहे.

सबब या जाहिर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, वर नमुद कागदपत्र कोणासही सापडल्यास ती सदरहु जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासुन आठ दिवसाचे कालावधीमध्ये खाली सही करणार यांचेकडे प्रत्यक्ष आणुन द्यावीत वा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवुन द्यावीत. याप्रमाणे कोणीही सदरहु कागदपत्र आणुन न दिल्यास वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल न झाल्यास, त्याबाबत आमचे अशील योग्य तो निर्णय घेतील.

**उरण**
**दि. १७-०७-२०२६**

**सही/-**
**ॲड. रमाकांत पाटील**
**वकिल**

ऑफीस : ९, साईआकाश अपार्टमेंट, करंजा रोड, राजपाल नाका,डाके हॉस्पीटलजवळ उरण, ता. उरण, जि. रायगड

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी तालुका संसाधन कक्षाचे उद्‌घाटन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील जिल्हा परिषदेच्या कन्या शाळेत दिव्यांग विद्यार्थ्यांना उपचार करण्यात यावेत म्हणून तालुका संसाधन कक्ष उभारण्यात आला आहे. या कक्षाचे उदघाट्न आज करण्यात आले. असून लगेचच विद्यार्थ्यांवर उपचार सुरु करण्यात आले. संसाधन कक्षामध्ये फिजिओथेरपी अॅक्युपेशनल थेरपी व अध्ययन अनुभूती इत्यादी लाभ तालुक्यातील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना होणार आहे.



रायगड जिल्हा परिषदेच्या कर्जत शहरातील कन्या शाळेत दिव्यांग विद्यार्थ्यांना उपचार मिळावेत म्हणून तालुका संसाधन कक्ष उभारण्यात आला. यां कक्षाचे उदघाट्न सभापती नमिता घारे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपसभापती चित्रा ठाकरे, जिल्हा परिषद सदस्या सुनीता मोरे, सुवर्णा ठाकरे, पंचायत समिती सदस्य महेश खारीक, अक्षय तिटकरे, नमिता श्रीखंडे, सुषमा पवाळी, कविता पादीर गटविकास अधिकारी सुशांत पाटील, गट शिक्षण अधिकारी अनंत खैरे, समावेशित शिक्षण समन्वयक नवीद हाशमी, फिजिओ थेरपीस्ट सायरा शेख आदी उपस्थित होते.

गटविकास अधिकारी पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. केंद्र प्रमुख महेश खाडे यांनी प्रस्ताविकात तालुका संसाधन कक्षा बद्दल माहिती सांगितली. गट शिक्षण अधिकारी खैरे यांनी 'असेच केंद्र नेरळ मध्ये सुद्धा होणे गरजेचे आहे. या कक्षासाठी चार फिजिओ थेरीपीस्टची आवश्यकता आहे. मात्र त्यांच्या मानधनाचा प्रश्न सोडविला पाहिजे. ' असे सूचित केले. नमिता घारे यांनी 'या केंद्राचा विस्तार करण्यासाठी जागा उपलब्ध आहे. तसे केल्यास जास्त विद्यार्थ्यांवर उपचार करता येतील.' असे सांगितले. सभापती घारे यांच्या हस्ते होमबेस विद्यार्थ्यांना फिजिओथेरपी मॅट (बेड) वितरित करण्यात आले. सूत्रसंचालन महेश खाडे यांनी तर आभार प्रदर्शन पद्माकर म्हात्रे यांनी केले.

याप्रसंगी विस्तार अधिकारी नारायण सोनावणे, देविदास जाधव, केंद्र प्रमुख बिभीषण नवले आदी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

सुचना देण्यात येते की, मे. नवज्योत को. ऑप. हौ. सोसायटी लि. (नियेजीत) तर्फे श्री. सदाशिव किसन जाधव, राहणारवळवळी, ता. पनवेल, जि. रायगड. यांच्या संस्थेच्या नावे असलेली मिळकती पनवेल महानगरपालिका यांचे हददीतील आणि मे. सब रजिस्टार पनवेल यांचे अधिकार क्षेत्रातील ग्रुप ग्रामपंचायत वळवळी यांचे हददीतील, मौजे वळवळी, ता. पनवेल, जि. रायगड. येथील रेव्हेन्यु रेर्काडमध्ये खालिल प्रमाणे सविस्तर वर्णन केलेली शेतजमिन जमिनीची मिळकत हया मिळकतीचे रेव्हेन्यु रेर्काड सात बारा उतारा खालिल प्रमाणे सविस्तर वर्णन

मिळकतीचे वर्णन

**मौजे - वळवळी, ता. पनवेल, जि. रायगड पनवेल महानगरपालिका येथील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत.**

| स.नं./ गट नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| ७३ | ४/अ | ०.१९.५०<br>पो.ख.०.०२.५०<br>एकूण ०.२२.००<br>पैकी ४.२२ | ३.२५ |

सदरच्या मिळकतीवर कोणाची काही हरकत आल्यास किंवा त्या सर्दभातील कुठलाही करार झाल्यास, सदर मिळकती संदर्भातील काही हक्क, हितसबंध, हिस्सा वा अधिकार असल्यास अशा व्यक्तींनी खालील पत्यावर सर्पक साधावा. तो सदर जाहीर नोटीस आजच्या प्रसिध्दीच्या तारखे पासुन १४ दिवसांच्या आत सादर करावे, अन्यथा सदर मिळकती संदर्भात कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, क्लेम, अधिकार वा बोजा नाही व असल्यास यांनी जाणुनबुजून सोडून दिला असल्याचे समजून, आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. वृषाली जितेंद्र वाघमारे**

शॉप नं २ हेरीटेज सीएचएस प्लॉट नं २२ सेक्टर ५ नवीन पनवेल

# डी. जी. तटकरे महाविद्यालय व वायफाय फाउंडेशन इन्क्युबेशन एनपीओ यांच्यात सामंजस्य करार

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, नवोपक्रम आणि स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या डी. जी. तटकरे महाविद्यालय, माणगाव आणि वायफाय फाउंडेशन इन्क्युबेशन एनपीओ यांच्यात सामंजस्य करार (MoU) करण्यात आला. या करारामुळे महाविद्यालयात "उद्योजकता, नवोपक्रम आणि स्टार्टअप उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यात येणार असून, उद्योग-अकादमिक सहकार्याला नवी दिशा मिळणार आहे.



सामंजस्य कराराअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी, माजी विद्यार्थी, संशोधक तसेच रायगड जिल्ह्यातील इतर महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना स्टार्टअप इन्क्युबेशन, उद्योजकता विकास, उद्योगतज्ज्ञांचे मार्गदर्शन, कौशल्य विकास, करिअर मार्गदर्शन, इंटर्नशिप, बौद्धिक संपदा हक्क (IPR) व पेटंट सहाय्य, कंपनी नोंदणी, व्यवसाय आराखडा तयार करणे, गुंतवणूकदार जोडणी, निधी उभारणी आणि शासकीय योजनांविषयी मार्गदर्शन अशा विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

महाड एमआयडीसी आणि परिसरातील उद्योगांशी समन्वय साधून औद्योगिक भेटी, लाइव्ह प्रोजेक्ट्स, उद्योग प्रशिक्षण, प्लेसमेंट ड्राइव्ह आणि उद्योग-अकादमिक सहकार्याचे विविध उपक्रम नियमित राबविण्यात येणार आहेत. निवडक स्टार्टअप्सना इक्विटी शेअरिंगच्या माध्यमातून ₹७० लाखांपर्यंत आर्थिक सहाय्य, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, तांत्रिक सहाय्य, व्यवसाय विकास तसेच राष्ट्रीय स्तरावरील गुंतवणूकदार नेटवर्कशी जोडण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे, प्रभारी प्राचार्य डॉ.जे.आर. पांडेय, प्रा.आयशा बडे तसेच वायफाय फाउंडेशन इन्क्युबेशन एनपीओच्यावतीने संचालक स्मिता सानप, राजन संचेती, डॉ. सूर्यकांत पाटील, ओम पाटील आणि संस्थेच्या टीमने सहभाग घेतला.

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल पिनकोड-४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ११ (ई-निविदा) सन २०२६-२७**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप-** या निविदेमध्ये एकूण ०१ काम समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १७.०७.२०२६ सकाळी १०.०० ते दिनांक २४.०७.२०२६ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : १६/०७/२०२६**
**आरओसी- क्र-५/सी १७५२**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**

**CAREER OPPORTUNITY with India's Fastest-Growing Financial Planning Company**

Step into a rewarding future become a valued Partner with guaranteed Fixed Monthly Payouts and access to 9 streams of income.

**Eligibility & Preferences:**
- Education: 12th Pass or Graduate
Age: Senior Citizens (50+), Homemakers (40+)

**Rewards & Benefits:**
- Earn 1,00,000+ per month
- International trips & monthly gifts
- Prestige and recognition in a respected profession

**Application Deadline: 25 July 2026**
Contact Numbers: 9769213842/8369368792
Call Timings: 10:00 AM - 6:00 PM
Limited positions available!
Build a respected and fulfilling career while helping families secure their financial future through life insurance.

**Advertised By**
Er. Y. P. Singh, Associate Partner Channel, and Director ESRO, Industrial Safety Auditor, Expert in Fire Safety and Risk Assessment.

पान १ वरुन

## एसआयआर अभियान यशस्वी करा

पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक दशरथ म्हात्रे, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, बूथ प्रमुख, सेक्टर प्रमुख आदी उपस्थित होते.

यावेळी एसआयआर अभियानाची पनवेल मतदारसंघात प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, प्रत्येक मतदान केंद्रावर जाऊन अचूक व अद्ययावत मतदार नोंदणी सुनिश्चित करणे तसेच सर्वसामान्य नागरिकांपर्यंत या अभियानाची सविस्तर माहिती पोहचवणे याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह अन्य मान्यवरांनी बूथस्तरावरील सूक्ष्म नियोजन आणि कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्यांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की मैत्री गॅलेक्सी रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. मिळकत क्र. २६/० मौजे देवद (विकासवाडी) ता. पनवेल, जि. रायगड पिन कोड- ४१० २०६, क्षेत्रफळ ६०० चौ. मी., या इमारतीत ज्या लोकांनी विकासक व बिल्डर गॅलेक्सी हाईट तर्फे महेश रमेश सोमीस्कर व मैत्री इंन्फ्रा हौसींग प्रा.लि. तर्फे अझर आयुब भालदार यांच्याकडून ज्यांनी सदनिका/गाळे विकत घेतले असल्यास त्याचे नोंदणीकृत दस्तावेज मानीव अभिहस्तांतरण करणे कामी देणे अनिवार्य आहे. या करीता या मैत्री गॅलेक्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेच्या पदाधिकारी अध्यक्ष/सचिव यांचे सोबत प्रत्यक्ष भेटून संपर्क साधावा व आपल्या सुची - २ ची सर्टीफाईड झेरॉक्स प्रत संस्थेला मानीव अभिहस्तांतरण करणे कामी १५ दिवसात द्यावी.

ठिकाण:- देवद, पनवेल
दिनांक:- १६/०७/२०२६.

**सही/-**
**अध्यक्ष/सचिव/खजिनदार**
**मैत्री गॅलेक्सी स.गृ.सं**
**२६/०, देवद, पनवेल.**

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०६/२४३/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १६/०७/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना पुरवणी कार्यसूची**

प्रति,
मा.सदस्य/सदस्या, ................................................
पनवेल महानगरपालिका, पनवेल.

महोदय/महोदया,
पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र. ६, बुधवार दिनांक २२/०७/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या "आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल'' येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०६, दिनांक २२/०७/२०२६ ची**

**पुरवणी कार्यसूची विषयपत्रिका**

**३. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :**
**(मुळ विषयपत्रिकेत अ.क्र. १ ते २६ विषय समाविष्ट आहेत.)**

२७. "माझी वसुंधरा अभियान ४.०" अंतर्गत प्राप्त प्रथम क्रमांकाच्या बक्षीस रक्कमेंतर्गत प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात येणाऱ्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

२८. पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभूमी (अ.भू.क्र.१०६) येथील नादुरुस्त गॅस दाहिनी बदलून नवीन गॅस दाहिनी बसवणे. (दोन युनिट) या कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.

**(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये )**

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- १६/०७/२०२६.

**सही/-**
**नानासाहेब कामठे**
महापालिका सचिव
पनवेल महानगरपालिका

## ई-निविदा सूचना

महावितरण

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-४३ (2nd call ), टी-४४ (2nd call ), टी-४५ (2nd call ), टी-४६, टी-४७, टी-४८, टी-४९(Recall), टी-५०(3rd call ), टी-५१, टी-५२ (2nd call ), टी-५३ ,टी-५४, टी-५५, टी-५६, टी-५७, टी-५८, टी-५९, टी-६०, टी-६१, टी-६२, टी-६३ (2nd call ), टी-६४ (2nd call ) आणि टी-६५ (२०२६-२७) अशा एकुण **तेवीस** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. १७.०७.२०२६ पासून ते दि. २३.०७.२०२६ @१३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. २३.०७.२०२६ ला १५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

**(सही)**
**कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप**

# कळंबोलीत काँक्रीट रस्त्यांच्या विकासकामांचा प्रारंभ

**कळंबोली : प्रतिनिधी**

कळंबोली परिसरातील नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या विविध काँक्रीट रस्त्यांच्या विकासकामांचे भूमिपूजन गुरुवारी (दि. १६) पनवेल महानगरपालिकेच्या वतीने उत्साहात संपन्न झाले. या विकासकामांमुळे परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित, सुलभ आणि गतिमान होणार असून नागरिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण होणार आहे.



याअंतर्गत हिंदुस्तान बँक चौक ते सरोवर सोसायटी, साईनगर सोसायटी या मुख्य मार्गाच्या काँक्रीटीकरणासह जोसेफ गल्ली, जय अपार्टमेंट गल्ली, मच्छी मार्केट गल्ली आणि पल्लवी गल्ली येथील रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाच्या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नगरसेवक रामदास शेवाळे, नगरसेविका सायली सरक, नगरसेविका बायजा बारगजे, तसेच भाजप जिल्हा सरचिटणीस रविशेठ पाटील, शिवसेना शहरप्रमुख तुकाराम सरक यांच्यासह अन्य मान्यवर पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांनी सांगितले की, रस्त्यांच्या काँक्रीटीकरणामुळे वाहतुकीतील अडचणी दूर होऊन दर्जेदार रस्त्यांची सुविधा उपलब्ध होईल. पावसाळ्यातील गैरसोयी कमी होण्यासही या कामांचा फायदा होणार आहे. पुढील काळात कळंबोलीतील रस्त्यांचे काँक्रीटीकरण, गटारांची उभारणी व इतर मूलभूत सुविधांची विकासकामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येतील. दर्जेदार सुविधा उपलब्ध करून कळंबोलीच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध असल्याची ग्वाही यावेळी सर्व नगरसेवकांच्या वतीने देण्यात आली.

# उलव्यातील आलिशान फ्लॅट्समधील बेकायदेशीर लॉजिंगवर छापा

**पनवेल : वार्ताहर**

उलवे, सेक्टर-२३मधील उच्चभ्रू इमारतीमधील फ्लॅट्समध्ये शासनाचे सर्व नियम अक्षरशः धाब्यावर बसवून बेकायदेशीररित्या व्यावसायिक लॉजिंग चालविण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे. "अभिभा स्टे" नावाने बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या लॉजिंगवर उलवे पोलिसांनी छापा मारून ते बंद केले आहे. तसेच याप्रकरणी तीन भागीदार व्यावसायिकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उलवे पोलीस ठाण्याचे पथक रात्रीच्या सुमारास हद्दीत गस्त घालत होते. यावेळी सेक्टर-२३ मधील ब्रम्हराज एन्क्लेव्ह या इमारतीच्या सहाव्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक ६०१, ६०२, ६०३ आणि ६०४ मध्ये विनापरवाना व्यावसायिक स्तरावर लॉजिंग चालवले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी मध्यरात्री १.३० वाजण्याच्या सुमारास सदर ठिकाणी अचानक छापा टाकला. छाप्यादरम्यान सदर चार फ्लॅटमध्ये कोणतीही वैध परवानगी किंवा परवाना नसताना निवासी संकुलात लॉजिंग सुरू असल्याचे आढळून आले.

दरम्यान, आरोपींनी कोणत्याही शासकीय प्राधिकरणाची किंवा पोलिसांची परवानगी न घेता निवासी फ्लॅट्सचे व्यावसायिक लॉजिंगमध्ये रुपांतर केले होते. शासकीय आदेशांचे उल्लंघन करून ग्राहकांना बेकायदेशीररित्या वास्तव्यासाठी खोल्यादेखील दिल्या जात होत्या. पोलिसांनी घटनास्थळावरून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी केली असता त्यांच्याकडे व्यवसायाचा कोणताही वैध परवाना नसल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी अजय गर्ग (३५), रोनक अग्रवाल (४०) आणि पार्थ नजाज (२१) या तिन्ही भागीदारांविरोधात गुन्हा दाखल करून कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे.

# ‘सीकेटी’त अकरावीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात (ज्युनिअर कॉलेज) बुधवारी (दि.१५) बारावीच्या विद्यार्थ्यांकडून अकरावी आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स शाखेतील विद्यार्थ्यांचे अतिशय उत्साहात स्वागत करण्यात आले.



रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाच्या उपशिक्षण अधिकारी गावित, उरण पंचायत समितीच्या गटशिक्षण अधिकारी प्रियांका म्हात्रे, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य अ‍ॅड. राहुल घरत, स्टेट बोर्ड स्कूल्स इन्स्पेक्टर संतोष चव्हाण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास मराठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास म्हात्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, हरिश्चंद्र ठाकूर, पर्यवेक्षिका स्वाती पाटील तसेच शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

नेहा गायकवाड, साक्षी चकणे (बारावी विज्ञान), प्रिया तत्त्वा, सिमरप्रीत कौर, लहर फाटक, तन्वी मुकादम, आर्या म्हात्रे (बारावी कॉमर्स), नंदिनी वाघमारे (बारावी आर्ट्स) या विद्यार्थिनींनी कार्यक्रमाचे निवेदन केले. मागील वर्षी इयत्ता अकरावीमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांकडून यावर्षी अकरावीत नव्याने प्रवेश घेतलेल्या विराज कदम (९५.८० %), स्वरा पाटील (९४.२०%), स्वरा खांडेकर (९४.००%) (सायन्स), श्रवण गावंड (९४.४०%) (कॉमर्स), शरयू भोईर (८६.२०%) (आर्ट्स) या टॉपर विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन प्रतिनिधिक स्वागत करण्यात आले. तसेच अकरावीच्या विद्यार्थ्यांना अध्यापनातील सर्व विषयांची माहिती तसेच अध्यापन करणाऱ्या सर्व आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स विभागातील शिक्षकांचीही ओळख करून दिली.

अभ्यासात शेवटपर्यंत सातत्य ठेवा, विविध स्पर्धा परीक्षांसाठी तयार राहा, कॉलेजमध्ये शंभर टक्के उपस्थित रहा, असा सल्ला आपल्या भाषणातून गावित यांनी विद्यार्थ्यांना दिला. दहावीचा महत्त्वाचा टप्पा तुम्ही पार केला आहे. त्यामुळे तुमची पुढची दिशा तुमचे आयुष्य घडवणार आहे. सातत्याने अभ्यास करा. विविध स्पर्धांत भाग घ्या. त्यामुळे तुमचे व्यक्तिमत्त्व विकसित होते, असे आपल्या भाषणातून अ‍ॅड. राहुल घरत म्हणाले.

संतोष चव्हाण आपल्या मनोगतात म्हणाले की, विद्यार्थ्यांनो शिक्षणाला महत्त्व द्या. अभ्यासावर लक्ष केंद्रित करा. प्राचार्य प्रशांत मोरे यांनी विद्यालयाच्या प्रगत अशा पायाभूत सुविधांचा, संस्थेची मॅनेजमेंट कमिटी, अध्यापनाच्या विविध विषयांचा तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचा उल्लेख आपल्या भाषणातून केला. विद्यार्थ्यांतर्फे आयुष चित्ते, प्रिया तत्त्वा, नंदिनी वाघमारे, तर शिक्षकांतर्फे कौशल्या मोमीनगिरे, शशिकांत भोसले यांनी मनोगते व्यक्त केली.

## तळोजा अपघातातील जखमीचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा फेज-१ परिसरात भरधाव मोटारीने केलेल्या भीषण अपघातातील आणखी एका जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अंगावर गरम तेल पडल्याने गंभीर भाजलेल्या ३७ वर्षीय रामदुलारे गुप्ता यांचा नवी मुंबईतील नॅशनल बर्न्स सेंटर रुग्णालयात मृत्यू झाला. यामुळे या अपघातातील मृतांचा आकडा आता दोनवर पोहचला आहे.

रामदुलारे गुप्ता हे तळोजा परिसरातील रिद्धी-सिद्धी सोसायटीत सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होते. अपघाताच्या वेळी ते वडापाव खरेदी करण्यासाठी तेथे गेले होते. त्याचवेळी मोटारीने वडापावच्या हातगाडीला जोरदार धडक दिली. यामुळे कढईतील गरम तेल त्यांच्या अंगावर उडाल्याने ते गंभीर जखमी झाले होते. उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय नांगरे यांनी दिली आहे.

## पनवेल-जेएनपीटी मार्गावर धावत्या कारवर कोसळला लोखंडी खांब

### सुदैवाने मोठी दुर्घटना टळली

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल-जेएनपीटी मार्गावरील सुरू असलेल्या कामादरम्यान बुधवारी (दि. १५) धावत्या इनोव्हा कारवर लोखंडी बॅरिकेडचा एक मोठा खांब कोसळला. यावेळी मोठी दुर्घटना थोडक्यात टळली आहे. या घटनेत बदलापूर येथील अनिल अधिकारी यांच्या कारचे नुकसान झाले असून सुदैवाने ते या अपघातातून सुखरूप बचावले आहेत.



दरम्यान, मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार पनवेल-जेएनपीटी मार्गावर सुरू असलेल्या कामावेळी क्रेनद्वारे उचलण्यात आलेला लोखंडी भाग अचानक निसटून रस्त्यावरून जात असलेल्या एका इनोव्हा कारवर कोसळला. अपघाताच्या वेळी वाहनातील प्रवासी काही क्षणाच्या फरकाने बचावल्याने संभाव्य जीवितहानी टळली. या घटनेनंतर काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. या अपघाताची माहिती मिळताच यानंतर संबंधित यंत्रणा तत्काळ घटनास्थळी दाखल झाली होती. अखेर अपघातग्रस्त वाहन बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. यावेळी ही घटना पाहण्यासाठी परिसरात काही काळ गर्दी जमून आली होती.

## रोडपालीतून युवक बेपत्ता

**पनवेल** : पनवेलमधील रोडपाली येथील २३ वर्षीय युवक बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून कळंबोली पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. सागर समीन हुसेन (२३) रोडपाली येथील रहिवासी असून तो परत न आल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध केली, मात्र त्याचा कोणताही ठावठिकाणा न लागल्याने कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. युवकाची उंची पाच फूट आठ इंच, बांधा मध्यम, रंग सावळा, चेहरा गोल, केस काळे व भुवया दाट आहेत. हातावर सी अक्षराचा टॅटू असून डाव्या हातावर कोरियन भाषेतील काही शब्द गोंदलेले आहेत. पिवळ्या रंगाचा टी-शर्ट आणि काळ्या रंगाची फुल पॅन्ट परिधान केली होती. या युवकाबाबत माहिती मिळाल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा पो. हवा. मारुती पवार यांच्याशी संपर्क साधावा.

## पनवेल शहरात दिवसाढवळ्या घरफोडी

### १० लाखांचा ऐवज लंपास

**पनवेल : वार्ताहर**




पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत टिळक रोड परिसरातील एका घरात घरफोडी करून अज्ञात चोरट्याने तब्बल १० लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी भारती प्रदीप कदम (५३) यांच्या राहत्या घरात १४ जुलैला पहाटेच्या सुमारास चोरी झाली. फिर्यादी घराला कुलूप लावून बाहेर गेले असताना अज्ञात चोरट्याने घराचा कडीकोयंडा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. चोरीस गेलेल्या ऐवजात सोन्याचा शाही हार, पाटल्या, मोठे व छोटे मंगळसूत्र, सोन्याच्या चेन, कानातील दागिने, नथ, रिंग्ज, नेकलेस यांच्यासह रोख रकमेचा समावेश आहे.

एकूण १३.२५ तोळे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा मिळून सुमारे १०.७५ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला आहे. घटनास्थळी फॉरेन्सिक पथक आणि फिंगरप्रिंट तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले असून पुरावे संकलित करण्यात आले आहेत. पनवेल शहर पोलीस पुढील तपास करीत आहेत.








**श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर शिवाजीनगर**

**वर्ष २३ वे** || ॐ श्री बाळकृष्णाय नमः || **स्थापना २००३**

# पुण्यतिथी सोहळा



श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर) | श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर) | स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) पिताजी श्री. चांगू काना ठाकूर | स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) माताजी श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर | श्री समर्थ सद्गुरु दादामहाराज (मुंबई)

आपणांस कळविण्यात येते की, आमचे वडिल स्वानंद सुख निवासी ‘श्री. चांगू काना ठाकूर’ यांची पुण्यतिथी मिती आषाढ शु. ०२, शके १९४८, गुरुवार दिनांक १६/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री समर्थ दासबोध वाचन ग्रंथ श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरित्रामृत ग्रंथाचे पारायण प्रारंभ, आषाढ शु. ०३, विनायकी चतुर्थी, शके १९४८, शुक्रवार दिनांक १७/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता पुण्यतिथी निमीत्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधू भगिनींनी उपस्थित रहावे, ही विनंती.

## कार्यक्रम

| शुक्रवार, दिनांक १७/०७/२०२६ | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | नादब्रम्हा भजन मंडळ (खारघर-रांजणपाडा) बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी, वसंतशेठ पाटील (कोपर), ज्ञानेश्वर म्हात्रे (गव्हाण), गणपत ठाकूर (कोपर), भाऊ ठाकूर, नितीन ठाकूर (त. पाडा), श्री. महेश पाटील (न्हावा), पखवाज : निलेश पाटील (कोपरा) |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) |
| दुपारी १२.०० वाजता | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

**✻ कार्यक्रमाचे ठिकाण ✻**

श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण,
ता. पनवेल, जि. रायगड.
फोन नं. ९१६७९९१०४५

**✻ व्यवस्थापक ✻**

देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)
शिवाजीनगर- गव्हाण- न्हावे- न्हावेखाडी- कोपर (संचलित)

**✻ संयोजक ✻**

श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार)
आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

# श्रीवर्धनमध्ये समुद्राला मोठे उधाण; धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरून पाणी उलटले

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन परिसरात पावसाचा जोर ओसरला असला तरी देखील अमावस्येनंतर असलेल्या द्वितीयेला समुद्राला मोठे उधाण आल्याचे पाहायला मिळाले. सध्या समुद्र शांत झाला असला तरीही श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरती लाटा जोरजोराने आपटत होत्या व पाणी उंच उडत होते. तर काही ठिकाणी धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरून पाणी उलटल्याचे देखील पाहायला मिळाले. समुद्रात होत असलेली मानवनिर्मित अतिक्रमणे यामुळेच पाण्याची पातळी दिवसेंदिवस वाढत असलेली पाहायला मिळत आहे. श्रीवर्धन येथील जीवनाबंदर येथे समुद्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात दगड ओतून जेटीचे बांधकाम करण्यात येत आहे. सदरच्या बांधकामासाठी समुद्रामध्ये भराव ओतल्यानंतर समुद्राच्या पाण्याची पातळी वाढली आहे.



समुद्राला पूर्ण ओहोटी असताना देखील पाणी खूप मागे जाताना दिसत नाही. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांमधून देखील नाराजी व्यक्त होत असते. कारण भरतीच्या वेळी समुद्रकिनाऱ्यावर जाताच येत नाही. लाटा खूप मोठ्या प्रमाणात धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरती आपटत असल्यामुळे भरतीच्या वेळेत पर्यटकांना समुद्रकिनाऱ्यावर उतरता येत नाही.

मागील वर्षी याच गंभीर समस्येमुळे गणेश विसर्जनात देखील मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण झाला होता. कारण श्रीवर्धनच्या प्राचीन परंपरे प्रमाणे गणपती विसर्जनासाठी आणल्यानंतर वाळूवरती गणपतीचे पाट ठेवून आरती करण्यात येते व त्यानंतर गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात येते.

परंतु विसर्जनाच्या वेळी ओहोटी असून सुद्धा पाणी मागे जात नसल्यामुळे नागरिकांना मागील वर्षी धूपप्रतिबंधक बंधाऱ्यावरती गणपती ठेवून विसर्जन करावे लागले होते. त्यातच समुद्रकिनाऱ्यावर उतरण्यासाठी बांधण्यात आलेल्या रॅम्प वरती उतार जास्त असल्यामुळे गणपतीच्या हातगाड्या देखील नागरिकांना खाली नेता येत नाहीत.

ज्या ठिकाणी किनाऱ्यावर उतरण्यासाठी पायऱ्या बांधलेल्या होत्या त्या देखील लाटांनी पूर्णपणे उखडून गेलेल्या आहेत व त्या ठिकाणी देखील उतरणे अवघड होऊन बसते. त्यामुळे यावर्षी देखील गणेश विसर्जनाच्या वेळी नागरिकांना त्रास सहन करावा लागणार आहे. तरी प्रशासनाने गणेशोत्सवापूर्वी सदर पायऱ्यांचे काम करून घ्यावे, अशी मागणी केली जात आहे.

# खोपोलीत लाकडी दांडक्याने एकाची हत्या, आरोपी गजाआड

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली पेण रस्त्यावरील पालीफाटा येते शाब्दिक वादावरून एकाची हत्या झाल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली आहे, खोपोली पोलिसांनी माहिती मिळताच तपास करून आरोपीस गजाआड केले आहे.




रामसहाय काली प्रसाद पाल (रा. दहिवली) व दिनेश सिंग कुशवाह ५०. (रा. इसांबा फाटा), यांच्यामध्ये शुल्लक कारणावरून शाब्दिक वाद झाला यात दिनेश सिंग यांच्य डोक्यात रामसहाय् याने लाकडी दांडक्याने जोरदार प्रहार केला. यामुळे दिनेश सिंग यांस गंभीर दुखापत झाली, पण घटनेनंतर तो तेथून निघून गेला , काही वेळाने दिनेश सिंग जे पी पॅलेस हॉटेलच्या बाजूला असणाऱ्या गाळ्यामध्ये मृतावस्थेत आढळून आला,

या घटनेची खबर निखिल चौधरी याने खोपोली पोलिसांना दूरध्वनीवरून दिली. पोलीस निरीक्षक सचिन हिरे आपल्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल होऊन पाहणी केली, त्यानंतर तपासासाठी तीन पथके तयार केली, पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी तपासाच्या कामाला गती देऊन आरोपी रामसहाय यास ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे. काही तासातच गुन्ह्याचा तपास केल्याने खोपोली पोलिसांचे कौतुक करण्यात येत आहे. यासंदर्भात खोपोली पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर भीषण अपघात; भरधाव ट्रक ५० फूट दरीत कोसळला

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे मार्गावर दररोज लहान मोठे अपघात घडत असल्याने या ठिकाणी अनेक उपाय योजना राबवण्यात आले असल्या तरी अपघाताला आळा बसला नसताना गुरुवारी पहाटे पुन्हा एक भीषण अपघात घडला असून मुंबई- पुणे द्रुतगती महामार्गावर ढेकू गावाच्या हद्दीत ४० ते ५० फूट खोल दरीत ट्रक कोसळला.

या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या चालकाची तब्बल दोन तासांच्या अथक बचाव मोहीमेनंतर सुखरूप सुटका करण्यात आली. पुण्याकडून मुंबईच्या दिशेने दुग्धजन्य पदार्थ घेऊन जाणारा ट्रकचे चालकाचे द्रुतगती महामार्गावर नियंत्रण सुटल्याने खालापूर जवळील ढेकू गावात रस्त्यापासून सुमारे ४० ते ५० फूट खोल दरीत कोसळला. दरीत दाट झाडी, निसरडा उतार आणि अंधार असल्याने बचावकार्य अत्यंत कठीण बनले होते. अपघाताची भीषणता पाहता ट्रकमधील कोणीही जिवंत असण्याची शक्यता अत्यंत क्षीण वाटत होती. तरीही "जिवंत असेल तर बाहेर काढायचंच" या निर्धाराने सर्व यंत्रणा बचावकार्यासाठी धावून गेल्या.

अपघाताची माहिती मिळताच महामार्गावरील देवदूत यंत्रणा आणि लोकमान्य रुग्णालयाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर गुरुवारी पहाटे सुमारे १.४५ वाजता हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर, सौरभ घरत, निलेश कुदळे, धर्मा पाटील आणि फारूक शेख हे दोरखंड, स्पाईन बोर्ड व अन्य बचाव साहित्यांसह घटनास्थळी पोहोचले. दरीत उतरलेल्या पथकाला ट्रकचालक रवी राठोड गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. लोकमान्य रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळीच प्राथमिक उपचार करून रक्तस्त्राव नियंत्रणात आणला. यानंतर लोकमान्य हॉस्पिटलच्या ॲम्ब्युलन्समधून जखमी चालक रवी राठोड याला पुढील उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल पनवेल येथे तातडीने रवाना करण्यात आले.

तर त्यानंतर बचावकार्यात आणखी एक अडचण निर्माण झाली. जखमी चालकाने सुरुवातीला ट्रकमध्ये आणखी तीन जण अडकल्याचे सांगितल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. त्यानुसार समांतर शोध मोहीमही राबविण्यात आली. मात्र, चालकाची प्रकृती स्थिर झाल्यानंतर तो ट्रकमध्ये एकटाच असल्याचे स्पष्ट झाले. ट्रक मालकाशी संपर्क साधूनही याची खातरजमा करण्यात आली. यानंतर अत्यंत निसरड्या उतारावरून चालकाला स्पाईन बोर्डवर सुरक्षित स्थिर करून दोरखंड आणि क्रेनच्या साहाय्याने टप्प्याटप्प्याने वर आणण्यात आले.

या धाडसी बचाव मोहिमेत महामार्ग वाहतूक पोलीस (बोरघाट), खोपोली पोलीस स्टेशनचे कर्मचारी, एम एस आर डी सी ची देवदूत यंत्रणा, आयआरबी पेट्रोलिंग टीम, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, लोकमान्य हॉस्पिटलचे कर्मचारी आणि हेल्प फाउंडेशनचे सदस्य यांनी अत्यंत महत्वाची भूमिका बजावली.

जखमी चालकाला सुरक्षितपणे वर आणणे हे संपूर्ण मोहिमेतील सर्वात कठीण आव्हान होते. कोणतेही चुकीचे पाऊल चालकाच्या आणि बचाव करणाऱ्यांच्या जीवावर बेतू शकत होते. अंधार, निसरडा उतार, सतत घसरण्याचा धोका आणि वरून पडणारे दगड गोटे यांचा सामना करत हेल्प फाउंडेशनसह सर्व बचाव पथकाने अत्यंत संयमाने आणि कौशल्याने स्पाईन बोर्डवर चालकाला स्थिर केले. त्यानंतर त्याला सुरक्षित ठिकाणी आणण्यात आले आणि शेवटी आय आर बीच्या क्रेनच्या सहाय्याने वर घेतले. जवळपास दोन तास चाललेल्या या जीवघेण्या संघर्षानंतर चालक सुरक्षितपणे वर येताच उपस्थित सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.



# रायगड जिल्ह्यातील कर्जतला मध्य रेल्वेवरील आपत्कालीन वैद्यकीय कक्ष

**रोहा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील कर्जत रेल्वे स्थानकात मध्य रेल्वेवरील 'आपत्कालीन वैद्यकीय कक्ष' स्थापन करण्यात आला आहे.सध्या १२ स्थानकांवर आपत्कालीन वैद्यकीय कक्ष कार्यान्वित आहेत. यामध्ये भायखाळा, कुर्ला, लोकमान्य टिळक टर्मिनस, घाटकोपर, कांजूरमार्ग, भांडुप, ठाणे, डोंबिवली, कल्याण, टिटवाळा, कर्जत आणि वाशी या रेल्वे स्थानकाचा समावेश आहे.

मध्य रेल्वेचे 'आपत्कालीन वैद्यकीय कक्ष' प्रवाशांच्या वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी प्रभावी प्रतिसाद देण्यास मदत करत आहेत.मध्य रेल्वेने प्रवाशांचा प्रवास सुरक्षित आणि सुखकर करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. आणीबाणीच्या वेळी वैद्यकीय मदत पुरवण्याच्या दिशेने स्थानकांवर 'आपत्कालीन वैद्यकीय कक्ष' उभारणे हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.अशी माहीती मध्य रेल्वे प्रशासन कडुन देण्यात आले आहे.

` त्वरित वैद्यकीय मदत देण्यासाठी अनेक उपनगरीय स्थानकांवर आपत्कालीन वैद्यकीय कक्ष स्थापन केले आहेत. अपघात, आजारपण किंवा इतर घटनांमुळे वैद्यकीय आणीबाणीचा सामना करणाऱ्या अधिकृत प्रवाशांना (रेल्वे कर्मचाऱ्यांसह) प्रथमोपचार सुविधा देणे हा याचा मुख्य उद्देश आहे.

सध्या १२ स्थानकांवर आपत्कालीन वैद्यकीय कक्ष कार्यान्वित आहेत, ती म्हणजे: भायखाळा, कुर्ला, लोकमान्य टिळक टर्मिनस, घाटकोपर, कांजूरमार्ग, भांडुप, ठाणे, डोंबिवली, कल्याण, टिटवाळा, कर्जत आणि वाशी या रेल्वे स्थानकाचा समावेश आहे.

आणखी ३ स्थानकांवर यामध्ये चेंबूर, मानखुर्द आणि खोपोली या रेल्वे स्थानकांवर आपत्कालीन वैद्यकीय कक्ष उभारण्याचे काम सुरू आहे आणि या स्थानकांवरील सेवा लवकरच सुरू होईल.

आपत्कालीन वैद्यकीय कक्षामध्ये जीवनावश्यक वैद्यकीय उपकरणे, ऑक्सिजन पुरवठा, स्ट्रेचर्स आणि औषधे उपलब्ध आहेत; तसेच येथे चोवीस तास पात्र डॉक्टर आणि प्रशिक्षित पॅरामेडिकल कर्मचारी तैनात असतात. येथे पोर्टेबल लॅब, वैद्यकीय दुकान आणि रुग्णवाहिकेची सुविधाही उपलब्ध आहे.

मध्य रेल्वे ही सेवा आणखी स्थानकांपर्यंत विस्तारण्याची योजना आखत असून, मुंबई विभागातील ४० स्थानकांसाठी निविदा काढण्यात आल्या आहेत. वैद्यकीय आणीबाणीच्या वेळी प्रतिसाद देण्याचा कालावधी कमी करणे आणि 'गोल्डन अवर' दरम्यान अत्यंत आवश्यक वैद्यकीय मदत पुरवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

# हॉटेल व लॉजिंग व्यवसायावर पोलिसांची करडी नजर

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानी रायगडाला वर्षभर देश-विदेशातून हजारो पर्यटक, इतिहासप्रेमी आणि शिवभक्त भेट देत असतात. या ऐतिहासिक आणि राष्ट्रीय अस्मितेच्या पवित्र भूमीची सुरक्षितता, पर्यटकांचा विश्वास आणि कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने पाचाड येथे रायगड परिसरातील सर्व हॉटेल व लॉजिंग व्यावसायिकांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. महाड पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक अभिजित नवसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस रायगड व्यावसायिक संघटनेचे सुमारे ४० हॉटेल व लॉजिंग व्यावसायिक उपस्थित होते.

बैठकीत कायद्याचे पालन, पर्यटकांची सुरक्षा, गुन्हेगारीला प्रतिबंध आणि जबाबदार पर्यटन संस्कृती निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला.पोलीस निरीक्षक नवसे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "रायगड ही केवळ पर्यटनस्थळ नाही, तर महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचे आणि इतिहासाचे प्रतीक आहे. त्यामुळे येथे कोणत्याही प्रकारच्या बेकायदेशीर किंवा संशयास्पद हालचालींना अजिबात थारा दिला जाणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल." प्रत्येक हॉटेल व लॉजमध्ये येत्या १५ दिवसांत उच्च प्रतीचे व कार्यरत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रवेशद्वार, रिसेप्शन, पार्किंग व इतर महत्त्वाच्या ठिकाणांवर देखरेख असणे आवश्यक असून, आदेशाचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

शासनाने आवश्यक केलेले सर्व वैध परवाने अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. तपासणीदरम्यान त्रुटी आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. हॉटेलमध्ये मुक्काम करणाऱ्या प्रत्येक पाहुण्याची संपूर्ण माहिती रजिस्टरमध्ये नियमित नोंदविणे आणि ती आवश्यकतेनुसार पोलिसांना उपलब्ध करून देणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. प्रत्येक पाहुण्याकडून वैध ओळखपत्र घेणे सक्तीचे करण्यात आले असून, ओळख न पडताळता कोणालाही रूम देऊ नये, असे निर्देश देण्यात आले. १८ वर्षांखालील व्यक्तींना तसेच आवश्यक कागदपत्रे किंवा कायदेशीर अटी पूर्ण न करणाऱ्यांना रूम देऊ नये. संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले.

हॉटेल किंवा लॉजचा वापर देहविक्री, वेश्याव्यवसाय, अमली पदार्थांचा व्यवहार किंवा इतर कोणत्याही गुन्हेगारी कृत्यासाठी होत असल्याचे आढळल्यास संबंधित मालक, व्यवस्थापक व जबाबदार व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला. बैठकीच्या शेवटी रायगड व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष रघुवीर देशमुख आणि सचिव तानाजी महादेव औकीरकर यांनी सर्व हॉटेल व लॉजिंग व्यावसायिकांना प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे प्रामाणिकपणे पालन करण्याचे, पर्यटकांचा विश्वास अबाधित ठेवण्याचे आणि रायगडची सुरक्षित, स्वच्छ व आदर्श पर्यटनस्थळ म्हणून ओळख अधिक दृढ करण्यासाठी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन केले.

# मुरूड तालुक्यात पावसाअभावी धूळ पेरणी फुकट गेल्याने रोहू पद्धतीचा अवलंब

**मुरुड : प्रतिनिधी**

अल-नीनोच्या प्रभावामुळे पाऊस उशिरा पडला असून कमी कालावधी मध्ये मुरुड तालुक्यात सुमारे १५०० मि.मी हून अधिक पाऊस कोसळल्याने भात पिकाच्या रोपवाटिका पाण्यामध्ये बुडून रोपांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची स्थिती आहे .



मुरुड तालुक्यातबागायत शेतीच्या लगत असणाऱ्या शेतकऱ्यांनी धुळ पेरणी कशीबशी जगवली असली तरी हे प्रमाण ५% पेक्षा अधिक नाही. काहींच्या विहीरी आहेत पण वापरात नाहीत अशी स्थिती आहे .त्यामुळे ९५ टक्के शेतकऱ्यांना रऊ पद्धतीचा अवलंब केल्या शिवाय पुर्नलागवड अशक्य आहे .

सर्वसाधारणतः ३० टक्के पर्यंत शेतकऱ्यांनी रऊ पद्धतीचाअवलंब करून रोपवाटिका तयार केली आहे .सलग दहा दिवसांपासून पावसाचा खंड पडल्यामुळे पुनर्रलागवड अद्याप सुरू झालेली नाही. गत वर्षी जून मधे केलेल्या धुळपेरणी च्या जोरावर जुलै च्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत ६० टक्के लावणी पूर्ण झाली होती मात्र ह्या वर्षी रोहू पद्धतीने पेरणी केल्यामुळे पावसाने साथ दिली तरच पुर्नलागवड शक्य होणार आहे . परिणामी भात क्षेत्र अधिक तर पडीक राहण्याची भीती व्यक्त होत आहे .

रोहू या भात पिकाच्या पेरणी पद्धतीमध्ये बियाणे सुताच्या गोणपाटामध्ये २४ ते ४८ तास पाण्यामध्ये भिजत घालून त्यानंतर त्यांना अंकुर आल्यावर ते भात शेतीमध्ये चिखलावर शिंपडून रोपवाटिका तयार केली जाते आणि त्याची पुनर् लागवड केली जाते. या प्रक्रियेला किमान २० दिवस लागतात .शेतकऱ्यांनी रोहू पद्धतीने पेरणी करून सुरुवातीच्या काळात भात खाचरातील पाण्याचा पूर्णपणे निचरा होईल याची काळजी घेणे गरजेचे आहे .मुरुड तालुक्यात ३३००हेक्टर भात लागवडीचं क्षेत्र असुन या क्षेत्रामध्ये शेतकरी सुवर्णा, जया, कर्जत , रत्नागिरी ८,रूपाली, चिंटू, वाडा कोलम, रत्ना,शुभांगी, कर्जत व खारपट्यात जमिनीवर – पनवेल, इत्यादी भाताच्या जातीची पैकी सुवर्णा आणि जया या बियाण्यांचा वापर लागवडी साठी केला जातो .

धुळ पेरणी च्या रोपांना निसर्गाच्या पहिल्या पावसामध्ये नायट्रोजनचे प्रमाण अधिक असल्याने भात पीक जोमदार येते . रोहू पद्धतीने सुफला , युरिया सारखे खत दिले तरी रोपे एव्हढी जोमदार येत नसल्याचे शेतकरी सांगतात . या खेरीज १० किलो बियाणे वापरले असेल तर दोन ते तीन किलो बियाणे वाया जाते .

त्यातून यंदा पाऊस लांबल्या मुळेखरीप हंगामातील भात पिकाच्या रोपवाटिकेसाठी भात बियाण्यांची धूळपेरणी करता आली नाही .बहुतेक शेतकरी आंध्र प्रदेश व मध्यप्रदेशातील बियाणांचा वापर करीत असुन बियाणेही महागले आहेत. शिवाय शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांमुळे पेरणीची घाई करू नये. या सूचनांचा ही परिणाम झाला. एकंदरीत निसर्गाने साथ दिली. पाऊस वेळेवर आला तरच भाताची पुनर्लागवड होऊ शकेल.

# आपत्तीत सर्व यंत्रणांनी सतर्क राहून नागरिकांची काळजी घ्यावी –खासदार बारणे

**चौक : प्रतिनिधी**

संभाव्य आपत्तीत सर्व यंत्रणांनी सतर्क राहून नागरिकांची काळजी घ्यावी, आपत्ती व्यवस्थापन २४ तास कार्यरत असून गावखेड्यातील आणि आपत्ती सदृश ठिकाणच्या अधिकारी, कर्मचारी लोकप्रतिनिधी यांनी संपर्कात रहावे, असे आवाहन मावळ लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केले आहे.



खालापूर आणि कर्जत तालुक्यातील झालेल्या आपत्ती आणि संभाव्य होणाऱ्या आपत्तीचा आढावा खासदार श्रीरंग बारणे यांनी खालापूर नवीन प्रशासकीय कार्यालयात सर्व खातेप्रमुख यांची आढावा बैठक घेतली होती. यावेळी आमदार महेंद्र थोरवे उपस्थित होते.कर्जत व खालापूर तालुक्यात अलीकडील अतिवृष्टीमुळे पूरस्थिती, दरड कोसळणे, रस्ते, पूल, शेती, घरे तसेच सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक गावांतील जनजीवन विस्कळीत झाले असून नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर झालेल्या नुकसानीचा आढावा घेणे, विविध विभागांनी केलेल्या उपाययोजनांची माहिती घेणे तसेच पुढील आवश्यक कार्यवाही निश्चित करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्या सर्व अनुषंगाने ही बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी विद्युत विभागावर नाराजी व्यक्त करण्यात आली असून या विभागाचे कर्मचारी फोन न घेणे, ग्राहकांना नीट उत्तर न देणे आणि ठेकेदार यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करून कामकाज सुधारण्याच्या सूचना देण्यात आल्या. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांचा अनागोंदी कारभारावर नाराजी व्यक्त करण्यात आली मात्र या बैठकीला संबंधित अधिकारी उपस्थित नव्हते.

# थरारक विजयासह अर्जेंटिना वर्ल्डकप फायनलमध्ये

**अटलांटा** : लिओनेल मेस्सी याच्या नेतृत्वाखाली अर्जेंटिनाने पुन्हा एकदा दमदार कमबॅक करत इंग्लंडचा २–१ असा पराभव केला आणि सलग दुसऱ्यांदा फिफा वर्ल्डकप फायनल गाठली. आता न्यू जर्सी येथे होणाऱ्या अंतिम लढतीत अर्जेंटिनाचा सामना स्पेनशी होणार आहे.

इंग्लंडने दुसऱ्या हाफच्या ५५व्या मिनिटाला अँथनी गॉर्डन याच्या गोलमुळे आघाडी घेतली होती, मात्र सामना संपण्यास अवघी काही मिनिटे शिल्लक असताना अर्जेंटिनाने अप्रतिम पुनरागमन केले. ८५व्या मिनिटाला एन्झो फर्नांडेझ याने मेस्सीच्या अचूक पासवर गोल करत सामना १–१ असा बरोबरीत आणला. त्यानंतर स्टॉपेज टाइममध्ये लाऊटारो मार्टिनेझ याने मेस्सीच्या शानदार क्रॉसवर हेडर करत विजयी गोल नोंदवला.





















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com